दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

इसमास मारहाण करून दुचाकीला आग लावल्याने खळबळ

वर्धा : स्थानिक दयालनगर परिसरात इसमास मारहाण करत दुचाकीला आग लावल्याने एकच खळबळ निर्माण झाली. त्यात दुचाकीचे नुकसान झाले. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.
सावंगी टी पॉइंट येथील नेमीचंद यादव यांनी दयालनगर येथील दिनेश कैथवास यास रामटेक येथे कामासाठी येणार काय, अशी विचारणा केली. त्यावेळी काका म्हणून दिनेश कैथवास यास म्हटले असता मला काम देणारा कोण, असे म्हणत वाद करून नेमीचंद यादव यास मारहाण केली. दिनेश कैथवास यान यावेळी एम. एच. ३२ यू. ०४१९ क्रमांकाच्या दुचाकीला आग लावली. त्यात दुचाकी जळाल्याने ३० हजारांचे नुकसान झाले. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

पिपरी इको पार्कसाठी १५.३९ कोटी मंजूर
डॉ. पंकज भोयर यांच्या पाठपुराव्याला यश

इको पार्कसाठी वाढीव निधी मंजूर; वर्ध्याला मिळणार हरित ओळख



वर्धा : शहर व परिसरातील नागरिकांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. सालोड येथील इको पार्कनंतर आता पिपरी मेघे येथील टेकडीच्या पायथ्याशी उभारण्यात येत असलेल्या इको पार्कसाठी १५ कोटी ३९ लाख रुपयांचा वाढीव निधी मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पामागे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित असल्याचे मानले जात आहे.

गेल्या काही वर्षांत वर्धा शहराचा झपाट्याने विस्तार झाला असून लगतच्या सुमारे १४ गावांमध्येही शहरीकरण वाढले आहे. मात्र, नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी दर्जेदार उद्यानांची कमतरता जाणवत होती. ही बाब लक्षात घेऊन डॉ. भोयर यांनी शहरातील व आसपासच्या मोकळ्या जागांमध्ये उद्यानांची निर्मिती करण्यावर भर दिला.

यापूर्वी सालोड येथे सुमारे ३० कोटी रुपयांच्या निधीतून इको पार्क मंजूर करण्यात आले होते. त्याच धर्तीवर पिपरी मेघे येथे सामाजिक वनीकरण विभाग यांच्या माध्यमातून इको पार्क उभारण्यात आले आहे. मात्र, या पार्कमध्ये अधिक सुविधा व सौंदर्यवृद्धीसाठी निधीची गरज असल्याने डॉ. भोयर यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर करून पाठपुरावा केला होता.

नवीन निधीमुळे पिपरी मेघे येथील इको पार्कमध्ये पर्यावरणपूरक संकल्पनांवर आधारित विविध सुविधा उभारल्या जाणार आहेत. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांना निसर्ग, पर्यावरण आणि जैवविविधतेविषयी माहिती मिळावी यासाठी शैक्षणिक उपक्रम राबवले जाणार आहेत. बांबू व लाकडापासून तयार केलेले टेंट, स्थानिक नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर आणि निसर्गाशी सुसंगत रचना ही या प्रकल्पाची वैशिष्ट्ये असतील.

दरम्यान, निधी मंजूर केल्याबद्दल डॉ. भोयर यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन आभार मानले. तसेच बोर टायगर रिझर्व येथील विकासकामांचा आढावा घेण्यासाठी वर्धा येथे बैठक आयोजित करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

जिल्ह्यात STEMI प्रकल्पाचा विस्तारामुळे रुग्णांचे तातडीने निदान

३१ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ईसीजी सुविधा उपलब्ध



वर्धा (जिमाका): जिल्ह्यात हृदयविकाराच्या रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी उपचार मिळावेत यासाठी राबविण्यात येत असलेल्या STEMI (ST-Elevation Myocardial Infarction) प्रकल्पाचा विस्तार करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने निदान आणि संदर्भ सेवा उपलब्ध होत असून, मृत्युदर कमी करण्यास मदत होत आहे. वर्धा जिल्ह्यातील सर्व ३१ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ईसीजी तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे दुर्गम भागातील रुग्णांनाही जवळच्या केंद्रात ईसीजी तपासणी करून घेणे शक्य झाले आहे.

एप्रिल २०२१ मध्ये पायलट प्रकल्प म्हणून सुरू झालेल्या या उपक्रमात 'हब अँड स्पोक' मॉडेलचा अवलंब करण्यात आला होता. सुरुवातीला सहा आरोग्य संस्थांना स्पोक केंद्र म्हणून जोडण्यात आले होते. या माध्यमातून हृदयविकाराच्या रुग्णांचे वेळेवर निदान करून त्यांना उच्चस्तरीय आरोग्य संस्थेकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली.

हृदयविकाराच्या वाढत्या घटनांचा विचार करून मार्च २०२४ मध्ये या प्रकल्पाचा विस्तार करण्यात आला असून आतापर्यंत एकूण १९ हजार ८८४ नागरिकांची ईसीजी तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ६५७ प्रकरणांमध्ये गंभीर स्वरूपाच्या समस्या आढळून आल्या असून ११५ रुग्णांना एऊशिंघ असल्याचे निदान झाले आहे. या सर्व रुग्णांना 'गोल्डन अवर'मध्ये तात्काळ संदर्भित करून पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. त्यामुळे गुंतागुंत आणि मृत्यूदर कमी करण्यास मदत झाली आहे.

या प्रकल्पात आधुनिक Tricog ECG मशीनचा वापर करण्यात येत आहे. ही प्रणाली क्लाऊड-आधारित असून १२-लीड ईसीजी रेकॉर्ड करून तत्काळ केंद्रीय सर्व्हरवर डेटा अपलोड करते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने काही मिनिटांत प्राथमिक अहवाल तयार होतो. संपूर्ण प्रक्रिया सुमारे १० मिनिटांत पूर्ण होत असल्याने हृदयविकाराच्या झटक्याच्या वेळी जलद निर्णय घेणे शक्य होते.

नागरिकांना छातीत दुखणे, घाम येणे, श्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे जाणवल्यास किंवा जोखीम गटातील नागरिकांनी जवळच्या आरोग्य केंद्रात तात्काळ ईसीजी तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले यांनी केले आहे. एऊशिंघ प्रकल्पामुळे विशेषतः ग्रामीण व वंचित भागातील नागरिकांना सुलभ, वेगवान आणि जीव वाचवणारी हृदयविकार सेवा उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.

बायो-प्रोम प्रकल्पातून महिला सक्षमीकरण आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल

वर्धा (जिमाका): रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीवर होणारे दुष्परिणाम आणि शेतीच्या खर्चात होणारी वाढ कमी करण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर येथील महिलांनी एक नवा आदर्श निर्माण केला आहे. 'माविम' अंतर्गत स्वयंसिद्धा लोकसंचालित साधन केंद्राच्या माध्यमातून महिलांनी 'बायो प्रोम उत्पादन केंद्र' सुरू करून शेतीला सेंद्रिय पर्याय तर दिलाच, पण स्वतःच्या प्रगतीची नवी वाटही शोधली आहे.

शेतीचा वाढता उत्पादन खर्च आणि पर्यावरणावरील दुष्परिणाम रोखण्यासाठी सेंद्रिय शेतीला चालना देणे हा या प्रकल्पाचा सुरू करण्याचा मुख्य उद्देश आहे. स्थानिक पातळीवर दर्जेदार



खत उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण महिलांना हक्काचा रोजगार मिळवून देणे या हेतूने या केंद्राची स्थापना करण्यात आली.

सुमारे १ कोटी २७ लक्ष रुपयांच्या निधीतून हा प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पात सुमारे १०० महिला सहभागी झाल्या असून त्यापैकी २० ते २५ महिला थेट उत्पादन, पॅकिंग, विक्री व व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळतात. उर्वरित महिला स्वतःच्या शेतात या खताचा वापर करून इतरांसाठी आदर्श ठरत आहेत. या प्रक्रियेत महिलांना केवळ रोजगारच मिळाला नाही तर त्यांचा आत्मविश्वास, व्यवस्थापन कौशल्य आणि आर्थिक स्वावलंबनही वाढले. यामुळे ग्रामीण महिला केवळ कामगार न राहता खऱ्या अर्थाने 'उद्योजक' म्हणून पुढे येऊ लागल्या आहेत.

या प्रकल्पामुळे महिलांना नियमित उत्पन्नाचा स्त्रोत मिळाला. अनेक महिलांनी घरगुती उत्पन्नात लक्षणीय वाढ केली. काही महिलांनी स्वतःचे लघुउद्योग सुरू करण्याची प्रेरणा घेतली. गावात रोजगारनिर्मिती झाली आणि स्थलांतराचे प्रमाण कमी झाले. 'बायो-प्रोम' प्रकल्पाने महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, शाश्वत शेती आणि ग्रामीण विकास यांचा संगम साधला आहे. हा उपक्रम केवळ खतनिर्मितीपुरता मर्यादित न राहता ग्रामीण भागातील महिलांसाठी स्वावलंबनाचा नवा मार्ग ठरला आहे.

जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचा दौरा

वर्धा (जिमाका): जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी २४ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे. दि.२४ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता वर्धा शहरातील विविध जैन मंदिरांना भेटी देतील. सकाळी ९.३० वाजता चंद्रप्रभ जैन मंदिर येथे जैन समाज प्रतिनिधी व पदाधिकारी यांची बैठक घेतील. सकाळी ११.१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी ३ वाजता पत्रकार परिषदेस उपस्थिती. दुपारी ४ वाजता सेवाग्राम आश्रमास भेट देतील. सायंकाळी ६ वाजता पुलगाव येथील जैन मंदिरास भेट व समाज प्रतिनिधीं सोबत बैठक घेतील. सायंकाळी ७ वाजता पुलगाव येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

कर्जबाजारीपणामुळे वडगाव जंगली येथील शेतकऱ्यांची विहीरीत उडी घेऊन आत्महत्या

सेलू : तालुक्यातील वडगाव जंगली येथील ज्ञानेश्वर देवाजी भुरसे वय ६७ वर्ष या शेतकऱ्याने सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे शेतातील विहीरील उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी सकाळी अकरा वाजता चे दरम्यान उघडकीस आली

ज्ञानेश्वर भुरसे हे शनिवार दिनांक १८ला घरुन निघुन गेले ते अचानक बेपत्ता झाल्याने .घरच्यांनी नातेवाईकाकडे व इकडे - तिकडे शोधाशोध केली पण . त्यांचा पत्ता न लागल्याने सोमवार दि २० ला याबाबत सेलू पोलीस स्टेशनला मिसींगची तक्रार दाखल करण्यात आली.

बुधवार दिनांक २२ रोजी सकाळी ११ वाजता जुनगड येथील राजेंद्र उडाण यांचे मालकीचे मौजा वडगाव जंगली शिवारातील शेतातील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आला.

याची माहिती वडगाव जंगली येथील पोलीस पाटिल स्वप्नील सयाम यांनी सेलू पोलीसांना दिली.सेलू पोलीस स्टेशनचे प्रशांत श्रीवास्तव, किरण वरभे यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला.

शव ताब्यात घेऊन विच्छेदनासाठी सेलू येथील सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले त्यांचे पार्थिवावर वडगाव जंगली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले .

ज्ञानेश्वर देवाजी भुरसे यांच्याकडे चार एकर शेती आहे.त्यांचेवर केळझर येथील महाराष्ट्र बँकेचे एक लाख दहा हजार रुपयांचे कर्ज असून काही खाजगी ब्यांकेचे कर्ज असल्याची माहिती कुटुंबानी दिली. एक महिन्या आधी त्यांच्या दोन्ही मुलांचा अपघात झाला होता.दोन्ही मुलाच्या पायाला जबर मार लागल्याने .दोन्हीमुले जाग्यावरचेच झाले आहे ,त्यामुळे पत्नी ,दोन मुल ,सुन आणी नात यांचा सांभाळ करत सर्व कुटुंबाचा भार आणी मुलांचा दवाखान्याचा खर्च पाहता त्यांचेवर कर्जाचा डोंगर वाढला आधीच नापीकी आणि शेतीमालाला मिळणाऱ्या अल्पदरामुळे आर्थिक विवंचनेत असलेल्या भुरसे यांनी विहिरीत उडी मारून आपली जीवनयात्रा संपवली त्यांचे या आत्महत्येमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मशरुम उद्योगाच्या माध्यमातून साधली आर्थिक प्रगती

चिंचाळा येथील स्नेहलता सावरकर यांची प्रेरणादायी यशोगाथा

वर्धा (जिमाका) : स्वयंसहायता महिला गटाची चळवळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उभी राहिली आहे. हजारो महिलांना गटाच्या माध्यमातून आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले. काही महिला उमेद, माविमच्या सहकार्याने उद्योजक, व्यावसायीक झाल्या आहे. मशरुम शेतीतून चिंचाळा येथील स्नेहलता मनोज सावरकर यांनी अशीच प्रेरणादायी यशोगाथा निर्माण केली आहे.

वर्धा तालुक्यातील चिंचाळा या गावातील रहिवासी असलेल्या स्नेहलता मनोज सावरकर या उन्नती लोकसंचालित साधन केंद्र, वर्धा अंतर्गत कार्यरत संबोधी स्वयं सहाय्यता महिला बचतगटाच्या सक्रिय व प्रगत सदस्य आहेत. त्यांनी ग्रामीण परिस्थितीतून पुढे येत मशरूम



उद्योगाच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्याकडे सुमारे २ एकर शेती आहे. या शेतीतून त्यांना मर्यादित उत्पन्न मिळत होते. आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी पर्यायी व्यवसाय शोधण्याचा निर्णय घेतला. लोकसंचालित साधन केंद्राच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा येथे मशरूम उत्पादनाचे प्रशिक्षण घेतले आणि लहान प्रमाणात व्यवसाय सुरू केला.

सुरुवातीला कमी प्रमाणात मशरूम लागवड करतांना अनेक अडचणी आल्या. मात्र त्यांनी चिकाटी व कुटुंबाच्या सहकार्याने व्यवसायात सातत्य ठेवले. तेजस्विनी अंतर्गत त्यांनी सुमारे २ लाख रुपयांचे कर्ज घेतले. या कर्जाच्या माध्यमातून त्यांनी डार्क रूम, उत्पादन कक्ष उभारणी, बेड्स तयार करणे व मशरूम प्रक्रिया युनिट विकसित केले. यामुळे त्यांच्या व्यवसायाला गती मिळाली व उत्पादन क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली.

आता त्या मशरूम उत्पादन व प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणावर चालवत आहेत. २ हजार बेड्सवर मशरूम लागवड नियंत्रित वातावरणात उत्पादन प्रक्रिया उद्योगासह एकात्मिक व्यवसाय करत आहे. त्यांनी आपल्या मशरुम उत्पादनाचे मुल्यवर्धन केले. त्यातून त्या मशरुमची विविध उत्पादने घेतात. त्यात ताजे व वाळवलेले मशरूम, मशरूम पावडर, चटणी, मसाला मशरूम पापड, वडी, बिस्कीट, नानखटाई, लोणचे, मुरंबा, चटपटा पदार्थ, फेसपॅक व इतर पुरक उत्पादनांमध्ये गांडूळ खत व वर्मी वॉश मुल्यवर्धनामुळे उत्पादनाला अधिक किंमत व बाजारपेठ मिळाली आहे.

दोन हजार बेडवर ५० दिवसांत ३ वेळा उत्पादन घेतात. त्यात दररोज सुमारे ५ किलो उत्पादन होते. स्थानिक बाजारपेठ, किरकोळ विक्रेते, विक्री प्रदर्शनांच्या माध्यमातून त्या उत्पादने विकतात. ठिकठिकाणी त्यांच्य मशरुम उत्पादनांना चांगली मागणी आहे. कर्जाच्या योग्य वापरामुळे त्यांच्या उत्पादन व उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. मुल्यवर्धित उत्पादनामुळे नफा अधिक वाढला असून व्यवसाय स्थिर झाला आहे. त्यांनी आपल्या मशरुम निर्मिती उद्योगात सुमारे १२ ग्रामीण महिलांना रोजगार देऊन स्वावलंबी बनविण्यात योगदान दिले आहे. त्यांच्या या प्रेरणादायी कामामुळे त्यांनी विविध पुरस्कारांनी देखील गौरविण्यात आले आहे.

खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस सेलू पोलिसांनी केले जेरबंद

सेलू : पोलीस स्टेशन सेलू येथे दिनांक ११/०४/२०२६ रोजी फिर्यादी नामे सौ.पुष्पा योगराज राऊत रा. बेलगाव ता.सेलू, जि.वर्धा यांनी पोलीस स्टेशनला येवून तक्रार दिली की, त्यांच्या मुलगा प्रवीण राऊत याचा आरोपी नामे सूरज ढगे, व फारूक करीम खा पठाण दोन्ही राहणार बेलगाव तह सेलू यांनी खून करून त्याचा मृतदेह बोर नदीपात्रात फेकून दिला आहे अशा तक्रारी वरून नमूद आरोपी यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन सेलू येथे अप न २८८/२६ कलम १०३(३), २३८, ३(५) भारतीय न्यास संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील आरोपी नामे सूरज ढगे यास अटक करण्यात आली होती. तर आरोपी नामे फारूक करीम खा पठाण रा. बेलगाव हा फरार झाला होता.

तपासादरम्यान ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांचे मार्गदर्शनात सेलू पोलीसांनी तपास चक्र फिरवून सदर गुन्हयाचा तांत्रीक पध्दतीने तपास करून दिनांक २१/०४/२०२६ रोजी सदर गुन्हयातील फरार आरोपी नामे फारूक करीम खा पठाण वय ३२ वर्ष, रा. बेलगाव, तह सेलू, जिल्हा वर्धा याचा शोध घेऊन त्यास नागपूर येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली तसेच सदर गुन्ह्यात आरोपी नामे गणेश रमेश ढगे वय २६ वर्ष रा. बेलगाव रोड सेलू याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास बेलगाव येथून अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रितम निमगडे करीत आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री.सौरभकुमार अग्रवाल साहेब , मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सदाशिव वाघमारे, मा, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. प्रमोद मकेश्वर यांचे मार्गदर्शनात सेलू ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांचे निर्देशाप्रमाणे पो.उपनि. प्रितम निमगडे, पोलीस अमंलदार गणेश राऊत, जावेद धामिया, ज्ञानदेव वनवे, पोलीस स्टेशन सेलू यांनी केली.

संपादकीय



तर्क कठीण, अंदाज अवघड



आक्रमक पवित्रा, युद्धाच्या धमक्या आणि आर्थिक नाकेबंदी करूनही इराणला नमवण्यात आलेले अपयश, हे सध्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी सर्वात मोठे राजकीय संकट बनले आहे. इराणने अमेरिकेवर अविश्वासाचा शिक्का मारत वाटाघाटी नाकारल्याने ट्रम्प स्वतःच विणलेल्या चक्रव्युहात अडकले आहेत.'

अमेरिकेने जाहीर केलेल्या संघर्ष विरामाची मुदत काल पहाटे संपली, तरी संध्याकाळपर्यंत अमेरिका किंवा इराणने परस्परांवर कोणताही नवा हल्ला केला नव्हता. अमेरिका आणि इराणमध्ये सुरू झालेल्या चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरली. त्यानंतर अमेरिकेने पाकिस्तानला पुन्हा पुढे करून चर्चेच्या दुसऱ्या फेरीची घोषणा केली. पाकिस्तानने इराणची समजूत काढण्याचे प्रयत्न केले. चर्चेसाठी कडेकोट बंदोबस्त केला. अमेरिकेचे शिष्टमंडळ इस्लामाबादला पोहोचलं. पण, इराणने या सगळ्याला प्रतिसादच दिला नाही. शिष्टमंडळ पाठवणं दूरच; उलट अमेरिकेवर अविश्वासाचा आरोप केला.

अमेरिकेने स्वतःहून दोन आठवडे युद्धबंदी करून बोलण्यांच्या दुसऱ्या फेरीसाठी भरपूर दबाव टाकूनही इराण अजिबात बधला नाही. उलट, पूर्वीच्या अटी - शर्तींमध्ये वाढ करून त्याची पूर्तता झाली, तरच बोलण्यासाठी बसू, असा पवित्र घेतला. इराणच्या या भूमिकेमागे चीन आणि रशिया या दोन महासत्तांची फूस आहे, असं जागतिक पातळीवर मानलं जातं आहे. असेलही. त्यांची पडद्याआडून मदत असेल, नैतिक आधार असेल; पण युद्धातले वार झेलावे लागताहेत ते एराणलाच ना? सर्वोच्च राष्ट्रप्रमुखासह अनेक वरिष्ठ सैन्याधिकारी गमावून, स्थावर मालमत्तेचं बरंच नुकसान सोसूनही इराण अमेरिकेसमोर मान तुकवायला तयार नाही, ही बाब जगात सर्वसामान्यांच्या दृष्टीने कौतुकाची ठरते आहे. आक्रमक डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेत्यानाहू या दोघांच्याही विरोधात त्यांच्या त्यांच्या देशात रोज निदर्शनं सुरू झाली आहेत. जनक्षोभ वाढतो आहे. तशी परिस्थिती इराणमध्ये नाही. उलट, ट्रम्प ज्या सत्तापालटाचं श्रेय घेत आहेत, त्या सत्तापालटातून तिथे आलेलं 'इस्लामिक रिवोल्युशनरी गार्ड' आधीच्या सत्ताधीशांपेक्षा अमेरिकेविरोधात अधिक कडवं आहे! युद्धविरामाची मुदत संपताच आम्ही इराणवर प्रचंड मोठा हल्ला करू, सगळं बेचिराख करून टाकू वगैरे धमक्या देणाऱ्या ट्रम्प यांनी प्रत्यक्षात मुदत संपल्यानंतर बारा तास उलटूनही काहीही केलं नाही. हा संयम त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग नाही. हा नाईलाज आहे. इराणसह संपूर्ण वैश्विक राजनैतिक वर्तुळ हे जाणून आहे. म्हणून ते आता ट्रम्प यांच्यासमोर अटीवर अटी ठेवू लागले आहेत.त्यांच्या धमक्यांकडे सहज दुर्लक्ष करू लागले आहेत. या युद्धाचा शक्य तितक्या लवकर शेवट ही आता ट्रम्प यांची गरज आहे. इराणची नाही. मोठ्या सिंहगर्जना करून ट्रम्प यांनी ज्या चढाया केल्या, त्या सगळ्या फुकाच्या ठरण्याच्या भीतीने ट्रम्प यांना ग्रासलं आहे. ते स्वतःहूनच या सापळ्यात शिरले आहेत. त्यातून सुटण्यासाठी त्यांना सध्यातरी पाकिस्तानशिवाय दुसरा कुठला आधार दिसत नाही. ट्रम्प यांच्यावर किती नामुष्की ओढवली आहे, याची कल्पना यावरून यावी.

काँग्रेसच्या, म्हणजे अमेरिकेच्या संसदेच्या रितसर पूर्वपरवानगीविना राष्ट्रपतींनी परस्पर किती दिवस युद्ध करावं, त्यासाठी किती काळ सैन्य वापरावं, याला कायदेशीर मर्यादा आहेत. अमेरिकेचा कोणताही राष्ट्रपती युद्धारंभापासून ६० दिवसांपेक्षा अधिक काळ संसदेच्या रीतसर पूर्वपरवानगीविना युद्ध सुरू ठेवू शकत नाही. या ६० दिवसांना आणखी ३० दिवसांची मुदतवाढ आहे. पण, ती आपल्याच सैन्याला माघारी आणण्यासाठी. अमेरिकेने इराणवर क्षेपणास्त्राचा पहिला थेट हल्ला २८ मार्चला केला असला, तरी सैन्याची जमवाजमव आणि हलवाहलव त्यापूर्वीच सुरू केली होती. सैन्याच्या या हालचालीसाठी त्यांना २ मार्चला अधिकृत लेखी कल्पना द्यावी लागली होती. म्हणजे, २ मार्चपासून ६० दिवस मोजले, तर ही मुदत १ मे रोजी संपते. १ मेपर्यंत युद्ध कायमचं थांबलं नाही, तर ट्रम्प यांना सैन्याचा बेकायदा वापर करावा लागेल. या कायदेभंगासाठी अमेरिकेत ज्या तरतुदी असतील, त्याला त्यांना सामोरं जावं लागेल. हे टाळण्यासाठी ट्रम्प इराण विरुद्ध केलेल्या कारवाईला 'युद्ध' म्हणत नाहीत. 'सैनिकी मोहीम' म्हणताहेत. ही शाब्दिक पळवाट कितपत कामी येईल, याविषयी त्यांना स्वतःलाच शंका आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सन्मान्य तोडगा काढून १ मेपूर्वी हा संघर्ष संपवण्याचा, संपूर्ण अमेरिकी सैन्य परत मायदेशी बोलावण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्या या प्रयत्नाला कोणाचीच साथ नाही. उलट, ट्रम्प या सापळ्यात अडकावे, अशीच बहुतेकांची इच्छा आहे. ट्रम्प यांच्या मनमानी विक्षिप्तपणाचा, अशिष्टपणाचा प्रसाद सगळ्यांनाच मिळाला आहे. पाहुण्याच्या काठीने साप मारला जात असेल, तर कोण कशाला मधे पडेल? सगळे परिणामाची वाट पाहत आहेत.

मार्च अखेरीला सुरू झालेल्या या युद्धात आतापर्यंत ५ हजारांहून अधिक बळी गेले आहेत. सैनिकांबरोबरच सामान्य नागरिकांचाही त्यात समावेश आहे. होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून जगाला वेठीला धरण्याचं सामर्थ्य या संघर्षांत काहीही कारण नसताना इराणला प्राप्त झालं आहे. तेलाच्या किमती बॅरलला ११० अमेरिकेत डॉलरवर पोहोचल्या होत्या. ५० अब्ज अमेरिकी डॉलरपेक्षा अधिक नुकसान या संघर्षाने केलं आहे.

महिलांसाठी 'पिंक ई-रिक्षा' योजना : रोजगार, सुरक्षितता आणि स्वावलंबनाचा नवा अध्याय

राज्य शासनाने महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'पिंक ई-रिक्षा योजना' ही केवळ एक वाहतूक सुविधा नसून महिलांच्या रोजगार, सुरक्षितता आणि स्वावलंबनाचा नवा अध्याय ठरणार आहे.

योजनेचा उद्देश

आजच्या काळात महिलांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवावे आणि प्रवासात सुरक्षिततेची हमी द्यावी, या तिहेरी उद्देशाने ही योजना राबविण्यात आली आहे. उच्च शिक्षण घेतलेल्या मुलींना रोजगार मिळविण्याची संधी या योजनेतून उपलब्ध होईल.

आर्थिक सहाय्याचे स्वरूप

ई-रिक्षा खरेदीसाठी महिलांना केवळ २० टक्के आर्थिक भार उचलावा लागणार असून उर्वरित ८० टक्के शासन अनुदान स्वरूपात देणार आहे. याशिवाय सहकारी व राष्ट्रीयकृत बँकांकडून ५० टक्के कर्जाची सुविधा उपलब्ध होईल. ई-रिक्षा खरेदीमध्ये सर्व करांचा (उएऊ, नोंदणी, रोड टॅक्स) समावेश असेल. लाभार्थी महिलांना १० टक्के आर्थिक भार उचलावा लागेल.

प्रशिक्षण व सुविधा

योजनेत सहभागी होणाऱ्या महिलांना ई-रिक्षा चालविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर परवाना, गणवेश व ओळखपत्र देण्यात येईल. या माध्यमातून महिलांना केवळ रोजगारच नव्हे तर प्रवासात सुरक्षिततेची हमीही मिळेल.

सामाजिक परिणाम

'पिंक ई-रिक्षा योजना' ही महिलांच्या जीवनात अनेक सकारात्मक बदल घडविणारी ठरेल.

– महिलांना स्वावलंबनाची संधी मिळेल.

– आर्थिक परिपूर्णतेकडे वाटचाल होईल.

– प्रवासात सुरक्षिततेची भावना निर्माण होईल.

– समाजात महिलांच्या सहभागाला नवे बळ मिळेल.

दीर्घकालीन फायदे

या योजनेतून महिलांना पाच वर्षांच्या कालावधीत कर्जाची सुविधा मिळेल.

५० वर्षांपर्यंतच्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येईल. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

राज्य शासनाची ही योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. रोजगार, सुरक्षितता आणि स्वावलंबन या तिन्ही बाबींचा समन्वय साधणारी ही योजना महिलांना नवा आत्मविश्वास देईल. 'पिंक ई-रिक्षा योजना' ही केवळ एक सरकारी योजना नसून महिलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा मार्ग आहे.

संपर्क : महिला आर्थिक विकास महामंडळ आणि जिल्हा महिला व बालविकास कार्यालय

जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर

गांडूळ खत प्रकल्पाचा खर्चाचा अंदाज



शेतकरी बंधूंनो, यामध्ये सर्वप्रथम तुम्हाला कच्चा माल लागणार आहे, म्हणजेच लेंडीखत असेल, शेणखत असेल, काडीकचरा असेल, पालापाचोळा असेल, जमिनीवर टाकण्यासाठी कीटकनाशकांची पावडर असेल इत्यादी.. हा खर्च तुम्हाला एकूण चार हजार रुपये येणार आहे. याचा जर मजुरीचा खर्च पाहिला, तर मजुरी म्हणजे काय आहे की बेड भरणे, त्यानंतर तयार झालेला माल त्याठिकाणी काढणे, चाळणी पॅकिंग करणे असेल, त्यानंतर दररोज ४५ दिवस त्या ठिकाणी पाणी मारणे असेल, तर नक्कीच याचा खर्च तुम्हाला दोन हजार रुपये इतका येणार आहे. गांडूळाचा जर त्या ठिकाणी खर्च पाहिला, तर तुम्हाला एका बेडसाठी त्या ठिकाणी दीड किलो गांडूळ लागणार आहेत आणि याचा खर्च तुम्हाला ७५० रुपये इतका येणार आहे. तुम्हाला त्या ठिकाणी ञ्ज्ई ॅएची जर किंमत पाहिली, तर दोन हजार रुपये प्रतिबेड तुम्हाला त्या ठिकाणी बाजारात किंमत मोजावी लागेल. अशाप्रकारे एकूण खर्च जर आपण पाहिला, तर एका बेडमध्ये तुम्हाला खत तयार करण्यासाठी ८७५० रुपये इतका खर्च येणार आहे.

गांडूळ खत प्रकल्प माहिती:

गांडूळ खत प्रकल्प उभारण्यासाठी आपल्याकडे एक पुरेशी १ किंवा २ गुंठा दमट व हवेशीर जागा असणे आवश्यक आहे, ज्यामध्ये आपल्याला एक पत्र्याचा शेड बांधायचा आहे. शेड हा आपण आपल्या गरजेनुसार बांधणार, म्हणजेच जर तुम्हाला फक्त तुमच्या शेतीसाठीच गांडूळ खत तयार करायचे असेल, तर तुम्ही एक बारीक पत्र्याचा शेडदेखील उभा करू शकता आणि जर तुम्हाला व्यवसायाच्या दृष्टीने गांडूळ खत प्रकल्प उभा करायचा असेल, तर तुम्ही एक मोठा ३२ बाय १०० चा किंवा १०० बाय ४० चा एक शेड उभारू शकता, जेणेकरून तुम्हाला गांडूळ खताचा साठा हा खूप मोठ्या प्रमाणात करता येईल. आणि एक महत्त्वाची बाब म्हणजे शेड बांधताना आपण शेड हा दक्षिण-उत्तर या दिशेनी बांधा, कारण पूर्व आणि पश्चिम या दिशेने सूर्याचा प्रकाश हा जास्त येत असतो आणि त्याचा त्रास आपल्या गांडूळ खताला न होण्यासाठी आपण हा प्रकल्प दक्षिण-उत्तर या दिशेनी बांधावा, तसेच गांडूळ खत व्यवस्थित राहण्यासाठी आपण शेडला एक हिरव्या रंगाची नेटदेखील बांधू शकता जेणेकरून हवा व पाणी आत घुसणार नाही, तसे पाहायला गेले तर गांडूळ खत शेती ही जास्त खर्चिक बाब नाही; पण जर तुम्ही एका व्यवसायाच्या दृष्टीने पाहत असाल, तर तुम्ही खूप मोठ्या प्रमाणात काम करू शकता.



गांडूळ खत बेड्स:

शेड बांधल्यानंतर आपल्याला गांडूळ खत तयार करण्यासाठी शेडमध्ये एक चौकोनी आकाराचे उभे बेड्स तयार करावे लागतात. हे बेड्स आपण घरीसुद्धा विटांचे बांधकाम करून करू शकतो. सध्या जर तुम्ही मार्केटमध्ये पाहिले, तर तुम्हाला बारा बाय चार बाय दोन फूट या आकाराचे ञ्ज्ईॅए आलेले दिसून येतील. याच्यामध्ये जवळजवळ दीड टनापर्यंत त्या ठिकाणी तुमचा कच्चामाल बसतो आणि याच्यामध्ये फक्त ४५ दिवसांमध्ये तुम्हाला गांडूळ खत तयार झालेले त्या ठिकाणी दिसून येते. आपल्याला योग्य वाटेल त्या पद्धतीने आपण बेड्स तयार करू शकता किंवा विकत घेऊ शकता. खूप सारे शेतकरी दोन्ही पद्धतीच्या बेड्सचा वापर करून गांडूळ शेती करतात.

मेळघाट हाट : दुर्गम भागातील महिलांच्या उत्पादनांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या श्रमाला आणि त्यांच्या कौशल्यातून साकारलेल्या उत्पादनांना 'मेळघाट हाट' विक्री केंद्राच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन मिळत आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सायन्सकोर प्रांगणालगत आधुनिक महिला बचत गट उत्पादन विक्री केंद्र सुरु आहे. हे विक्री केंद्र ५ जानेवारी २०२५ पासून नागरिकांच्या सेवेत आहे.

मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला प्रथमच शहराच्या मध्यवस्तीत हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची थेट ग्राहकांना विक्री होत असल्याने मध्यस्थांची साखळी मोडीत निघत असून बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात विशेष वाढ होत आहे. या ठिकाणी ग्राहकांसाठी मेळघाटातील वैविध्यपूर्ण वनौषधी, बांबूंपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, रानमेवा आणि शुद्ध मध यासारख्या दुर्मिळ वस्तूंची मोठी श्रेणी खरेदीसाठी उपलब्ध आहे. आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत-जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांची कला-कौशल्याला योग्य दिशा मिळावी तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनात वैविध्य आणून त्यांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळघाट हाटची निर्मिती करण्यात आली आहे.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना राष्ट्रीय स्तरावर योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, आकर्षक पॅकिंग व प्रभावी ब्रँडिंग करणे ही काळाची गरज आहे.

हीच बाब लक्षात घेऊन महिला बचत गटांना या तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उत्पादित मालाला राज्यासह संपूर्ण देशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी, याच हेतूने हे मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकाच छताखाली मेळघाटातील ४७ प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम टप्प्यात एकूण ६० स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनांचा यात समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूपासून निर्मित विविध उत्पादने, तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदूळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्याची जगप्रसिद्ध कॉफी, मध आणि शुद्ध तूप यांचा समावेश आहे. याशिवाय गृहशोभेच्या वस्तू आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून पौष्टिक खाद्यान्ने देखील येथे उपलब्ध आहेत. या केंद्राला आधुनिक मॉलचे स्वरूप देण्यात आले असून, येथे स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांना खरेदीचा एक वेगळा अनुभव मिळत आहे.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे 'खादी महोत्सवा'चेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती अंतर्गत धारणी तालुक्यातील महिलांनी कापसापासून सूत आणि सुतापासून कापड ते गारमेंटपर्यंतच्या उत्पादनांची निर्मिती करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या क्लस्टरतर्फे महिलांनी उत्पादीत केलेला माल खादी महोत्सवात विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. विकेंद्रित सोलर चरखा समूहाच्या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी महिलांनी तयार केलेली दर्जेदार खादी आणि सौर खादी उत्पादने येथे सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली होती, ज्याला अमरावतीकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी महिला भगिनींच्या बचत गटांना विक्री आणि विपणनासाठी एक सक्षम प्लॅटफॉर्म मिळाला असून, यामुळे महिला सक्षमीकरणासह आदिवासी क्षेत्रातील आर्थिक विकासाला निश्चितच मोठी गती मिळणार आहे.

– अपर्णा यावलकर
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय,
अमरावती

लेक लाडकी त्या घरची

मी वधू-वरांची स्थळे सुचवणाऱ्या दोन-तीन व्हाट्सअप ग्रुपला जॉईन आहे.काही लोक त्यांना स्थळ भेटीला मुलीकडे गेल्यानंतर जो अनुभव आला त्याबाबत ग्रुप वर व्यक्त होतात ; यापूर्वी वर पक्षाचे अनुभव मांडणारे लेख सुद्धा माझ्या वाचनात आले आहेत ; पण का कुणास ठाऊक आज मनातलं विचारांचं, चिंतनांचं आभाळ मोकळं करावं म्हणते.....

विवाह म्हणलं की अगदी पूर्वपार चालत आलेल्या रिती प्रथा आजही आहे , शिवाय आधुनिकतेची झालर त्याला चढवली जाते. मग फोटोशूट ,वधू-वरांचं मॅचींग शॉपिंग,प्री-वेडिंग शूट, संगीत अगदी सगळेच कार्यक्रम ,मुहूर्तमेढ, केळवण, हळद ,बस्ता, मेहंदी, संगीत सगळ्यांचीच सुंदर सजावट प्रत्येक कुटुंब आपल्या हौशीप्रमाणे करतं.बाजारात लग्न समारंभासाठी असंख्य प्रकारच्या मनमोहक ,देखण्या वस्तू ,कपडे उपलब्ध आहेत .सगळं कसं अगदी सोपस्कर झालय,पण लग्न म्हणजे दोन जीवांचे ,दोन कुटुंबाचं एकमेकांना जोडलं जाणं तेही आजन्म. लग्नाच्या या रेशीमगाठी हळुवारपणे जपून कायमस्वरूपी घट्ट होण्यासाठी दोन्हीकडून वरपक्ष व वधू पक्ष यांच्याकडून विशेष प्रयत्न आणि काळजी घ्यायला हवी .विवाहाचे पवित्र बंधन ज्याला भारतीय समाजात विशेष सामाजिक मान्यता आहे ,या विवाहबाबत समाजात जसे नवीन ट्रेंड रुजत आहेत तसे घराघरात विवाहबाबतच्या संकल्पना नव्या वळणावर येऊन थांबत आहेत.



प्रत्येक मुलगी उंबरठ्याचे माप ओलांडून सासरी येते. जी स्त्री आज उपवर असणाऱ्या मुलीची आई आहे ती काही वर्षांपूर्वी सासरी, आई-वडिलांनी ,आप्तेष्टांनी ठरवलेल्या वराशी विवाह करून आलेली असते .आज त्या स्त्रीच्या अवतीभवतीची परिस्थिती आधुनिक तंत्रज्ञान, शिक्षण आणि नवनवीन वातावरणातील बदल यामुळे बरीच बदललेली आहे. साधारण जुन्या स्त्रियांनी आपले वैवाहिक आयुष्य एकत्र कुटुंबात, नात्यांची जबाबदारी पेलण्यात,आपल्या विचारांना,स्वप्नांना मुरड घालून आहेत.

प्रत्येक आईला वाटते मी माझे आयुष्य खूपच मर्यादित,तुटपुंज्या गोष्टीत खर्च केले.माझी स्वप्ने अपूर्ण राहिली मग जेव्हा माझी मुलगी लग्नायोग्य होते तेव्हा तिला सुरुवातीपासूनच सगळ्याच गोष्टी परिपूर्ण हव्यातच.आईचा हाच व्यतीत केले. पूर्वी स्त्रियांना आपली मते कुटुंबात ठामपणे मांडण्याचे फारसे स्वातंत्र्य नव्हते.थोरामोठ्यांनी घालून दिलेले नियम, आदर्श प्रमाण मानून त्याप्रमाणे मार्गक्रमण करणे क्रमप्राप्त असायचे.

शिक्षणाने स्त्रियांना समाजात कर्तुत्व दाखवण्याची संधी मिळाली .कुटुंबात स्त्रियांना स्थान मिळू लागले.आज मोठमोठ्या पदांवर स्त्रिया कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटवत आहेत याचा सार्थ अभिमान वाटतो.तसेच जुनी स्त्री आचार विचारांमध्ये मर्यादा असणारी व आधुनिक स्त्री आचार विचारांनी गगनाला गवसणी घालणारी या दोन्हींमध्ये सुवर्णमध्य साधून आजची समाजातील कुटुंब पद्धती व विवाह संस्कार टिकणार आहेत.

अट्टाहास मुलीला ऐन लग्नाच्या वयात दिशाभूल करणारा ठरतो .आज मुलगी शिकलेली व कमावणारी असेल तर आपल्या होणाऱ्या कर्तुत्ववान पती बरोबर ती घरची सभोवतालची परिस्थिती पुढच्या काही वर्षात नक्कीच सुधारू शकते.यासाठी प्रत्येक पालक,माता-पित्याने शिकलेल्या कमावणाऱ्या मुलींना समंजसपणाची ,सुसंस्काराची शिदोरी देणं काळाची गरज झाली आहे. आज मुली सक्षम आहेत, शिक्षणाने,कायद्याने ,अर्थार्जनाने मग माहेरातून मुलीला वारसा रूपाने संयम ,परिस्थितीशी दोन हात करण्याची ताकद ,कुटुंब सांभाळण्यासाठी विनयशीलता, नम्रता ही अनमोल रत्ने मिळावी .स्त्री जशी कोमल, सौंदर्यवान असते तसेच स्वतःचे अस्तित्व टिकवताना ती तेवढीच कणखर, कठोर व स्वाभिमानी असते .अगदी लहानपणापासूनच कुटुंबात समाजाभिमुख विचारांचे , कृतीचे ,आचरण व्हावे.त्याचाच परिपाक म्हणून लग्नाच्या उंबरठ्यावर असलेली वधू दोन कुटुंब ,दोन वेगळ्या संस्कृती टिकवण्याची धुरा आदर्श पणे सांभाळेल हे निर्विवाद सत्य आहे. तेव्हा संपूर्ण कुटुंब व्यवस्थेचा कणा असलेली आई विवाह संस्था टिकवणारी दुवा ठरणार आहे. आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा ,स्वप्न ,सासरच्या नात्यांबाबत आलेले कटू अनुभव ,सासरी आपली स्वतःची जागा निर्माण करताना आलेले कडू -गोड अनुभव या सर्वांची भरपाई आपल्या मुलीला,'तू असंच कर,' तू तसंच कर ','शेरास सव्वाशेर','अजिबात कोणाला जुमानायचं नाही,'अशा शब्दात आईने मुलीला कधीही मार्गदर्शन करू नये. मोबाईल नावाच्या जग जवळ आणणाऱ्या साधनाने आई आणि मुलीच्या संवादाने नाती आणि संसारात कटूता आणण्याचा अतिशय वाईट परिणाम सध्या जाणवत आहे.आईने मुलीला कोणत्या गोष्टीसाठी किती आणि काय सांगायचं ,एखादा वाद किती ताणायचा की त्या वादाचा परिपाक नात्याचा शेवट असावा की आपल्या मुलीला समतोलाची भाषा, विचार द्यावे ही सगळीच जबाबदारी नक्कीच आईची आहे. पूर्वजांनी सांगितलेली म्हण, 'मुलापेक्षा मुलगी बरी, सासर आणि माहेर दोन्ही घरांचा उद्धार करी' खरंतर ही म्हण प्रत्यक्ष आजच्या काळात प्रत्येक आईने सार्थ करावी. मुलगी संसारात नवखी असते. तिला सासर-माहेर, नातीगोती, मित्रपरिवार,आपल्या महत्त्वाकांक्षा सगळं जपण्यासाठी योग्य मार्गदर्शन 'आई'नावाच्या गुरूकडून झालं तर मुलीची संसार वेल आनंदाने बहरून,डवरून जाईल;म्हणूनच आई की जी सासू व्हायला जाणार आहे ,या नात्याला गोड करण्यासाठीच एका आईचा हा सगळा लेखन प्रपंच.

।। सगळं काही शुभ होवो हीच शुभकामना ।।

लेखन : सौ. सविता रघुनाथ कदम
श्री.संत घाडगेनाथ हायस्कूल, कोळे, ता.कराड, जि.सातारा

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242

सातारा जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. निखिल पिंगळे यांना महालक्ष्मी आधार फाउंडेशनचे निवेदन व शुभेच्छा



सातारा : महालक्ष्मी आधार फाउंडेशनच्या वतीने संस्थापिका सौ. प्रतिभा सुनील शेलार यांनी सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. निखिल पिंगळे यांना विविध कायदा व सुव्यवस्था विषयक मुद्द्यांबाबत सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच भारतीय संविधानाची प्रस्तावना भेट देत त्यांना अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. त्यावेळी पत्रकार व बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर उपस्थित होते

या निवेदनामध्ये जिल्ह्यात वाढत असलेल्या सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, महिलांवरील अत्याचार, छेडछाड व कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागात पोलीस गस्त वाढवून चोरी व घरफोडी रोखाव्यात, तसेच शाळा व महाविद्यालय परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना राबवाव्यात, असेही नमूद करण्यात आले आहे. अवैध दारू विक्री व अंमली पदार्थांवर कठोर कारवाई, वाहतूक कोंडी व अपघातप्रवण ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवणे, तसेच सोशल मीडियावर अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाई करून जनजागृती करण्याची मागणीही करण्यात आली आहे. विशेषतः महिलांविरोधात अश्लील व अपमानास्पद भाष्य करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

तसेच महिला हेल्पलाईन अधिक कार्यक्षम करणे, गावपातळीवर पोलीस-नागरिक समन्वय वाढवणे, भाडेकरू नोंदणी प्रक्रिया प्रभावी करणे, सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे आणि नागरिकांच्या तक्रारींचे जलद व पारदर्शक निवारण व्हावे, यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, पोलीसांनी तक्रारदारांशी संवेदनशील व सन्मानपूर्वक वागावे, सातारा पोलिसांच्या प्रतिमेला धक्का लागू नये यासाठी शिस्त बळकट करावी, तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या कल्याण व ताणतणाव व्यवस्थापनावरही लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सातारा शहरातील वाढत्या अतिक्रमणाच्या समस्येकडेही लक्ष वेधण्यात आले असून, नगरपरिषद व वाहतूक पोलीसांनी तात्काळ कारवाई करून रस्ते व सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवाव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

वरील सर्व मुद्द्यांवर सकारात्मक व तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा महालक्ष्मी आधार फाउंडेशनच्या संस्थापिका प्रतिभा शेलार यांनी संपूर्ण सातारकरांच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

कृष्णा नदीची पाणी पातळी खालावली; पाणी पिवळसर, आरोग्याचा प्रश्न नैसर्गिक जलस्रोत धोक्यात



कराड: तालुक्यात नैसर्गिक स्रोत धोक्यात आले आहेत.वाढते तापमान, कृषी पंपांद्वारे होणारा मोठ्या प्रमाणातील पाण्याचा उपसा आदी कारणांमुळे कृष्णा नदीची पाणी पातळी लक्षणीयरीत्या खालावली आहे. परिणामी नदीतील पाणी पिवळसर झाले असून त्याला दुर्गंधीही येऊ लागली आहे. यामुळे नदीकाठच्या गावांमध्ये आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून तातडीने पाणी सोडण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

कोपर्डे हवेली परिसरातील वाहगाव, नडशी, उत्तर कोपर्डे, कोपर्डे हवेली, विरावडे, पार्ले, बनवडी आदी गावांना नळपाणी पुरवठा योजना प्रामुख्याने नदीवर अवलंबून आहे. ग्रामपंचायतीमार्फत फिल्टर योजना कार्यान्वित असल्या तरी सध्याच्या परिस्थितीत पाणी शुद्धीकरणाला मर्यादा येत आहेत. सध्या नदीतील पाणी प्रवाही नसून साचून राहिले आहे. खोडशी बंधारा असल्यामुळे पाण्याची फुगवटा वाहगाव ते नडशीपर्यंत पसरला आहे. पाणी स्थिर राहिल्याने त्यात दुर्गंधी निर्माण होत असून नदीकाठच्या झाडांची पाने, फुले यामुळे पाणी अधिक दूषित होत आहे. काही गावांमध्ये नदीकाठावरील विहिरींमधूनही पाणीपुरवठा केला जातो, मात्र त्यामध्येही नदीतीलच पाणी झिरपत असल्याने त्याची गुणवत्ता खालावत आहे.

कृष्णा नदीत धोम धरण, कन्हेर धरण आदी धरणांतून पाणी सोडले जाते. मात्र सध्या पाण्याची स्थिती खराब झाल्याने तातडीने नदीपात्रात पाणी सोडावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

'सध्या पाणी पिवळसर झाले असून दुर्गंधी येत आहे. एक-दोन दिवसांत पाणी सोडले नाही, तर नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे तातडीने नदीपात्रात पाणी सोडावे.'
– दत्तात्रय चव्हाण, सरपंच, कोपर्डे हवेली

खोडशी बंधाऱ्यामुळे पाणी साचून राहिल्याने सुमारे पाच ते सहा किलोमीटर परिसरातील गावांना दूषित पाण्याचा सामना करावा लागत आहे. याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

पिंपरी दुमाला येथे एआय कॅमेऱ्यांची बसवणूक; बिबट्या-मानव संघर्ष टाळण्यासाठी पुढाकार



प्रतिनिधी: बाळासाहेब कुंभार

रांजणगांव : तालुक्यातील पिंपरी दुमाला येथे बिबट्याच्या वाढत्या वावराच्या पार्श्वभूमीवर अत्याधुनिक एआय (Artificial Intelligence) तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरा मशीन बसवण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांमुळे आता गावकऱ्यांना बिबट्याच्या हालचालींची पूर्वकल्पना मिळणार असून सुरक्षिततेच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या एआय कॅमेऱ्यांची खास वैशिष्ट्ये म्हणजे, कॅमेऱ्यासमोर सुमारे १०० फूट अंतरावर बिबट्या आढळल्यास लगेच सायरन वाजू लागतो. त्यामुळे परिसरातील नागरिकांना तत्काळ सतर्कता मिळते. विशेषतः शेतात काम करणारे शेतकरी, लहान मुले व रात्रीच्या वेळी बाहेर असणाऱ्या नागरिकांसाठी ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

गेल्या काही वर्षांत शिरूर तालुक्यात बिबट्याचा वावर वाढल्याचे अनेकदा निदर्शनास आले आहे. पाळीव प्राण्यांवर हल्ले, तसेच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होण्याच्या घटना घडत असल्याने वनविभाग व स्थानिक प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पिंपरी दुमाला येथे एआय कॅमेऱ्यांची उभारणी करण्यात आली आहे.

तज्ज्ञांच्या मते, अशा तंत्रज्ञानामुळे बिबट्याच्या हालचालीवर लक्ष ठेवणे सोपे होते आणि मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यास मदत होते. तसेच, या कॅमेऱ्यांद्वारे मिळणारी माहिती वनविभागाला पुढील नियोजनासाठी उपयुक्त ठरणार आहे.

स्थानिक ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे स्वागत केले असून, 'आता किमान बिबट्या आल्याची पूर्वसूचना मिळेल, त्यामुळे आमचा जीव धोक्यात येणार नाही,' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

एकंदरीत, पिंपरी दुमाला येथे बसवण्यात आलेली ही एआय यंत्रणा गावकऱ्यांच्या सुरक्षेसाठी एक दिलासा देणारी आणि भविष्यातील स्मार्ट ग्राम संकल्पनेच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

मनुष्य व वन्य प्राणी संघर्ष पुन्हा चव्हाट्यावर



मनुष्य व वन्य प्राणी यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस रस्त्यावर दिसून येत आहे, जंगल आणि मानवी हस्तक्षेप यामुळे वन्य प्राणी रस्त्यावर दिसून येत आहेत अगदी मनुष्य वस्तीत सुद्धा काही दिवसांपूर्वी कराड तालुक्यातील शहापूर परिसरातील शेतामध्ये युवकांच्यावर बिबट्याने हल्ला केला होता त्यानंतर परिसरात भीतीचे वातावरण होते व वन खात्याने प्रतिबंधक उपाय म्हणून पिंजरे व कॅमेरे यांच्या माध्यमातून सापळा रचला परंतु अद्याप बिबट्या जेरबंद झाला नाही. त्यानंतर परिसरात अफवा व प्रत्यक्षात आणि ठिकाणी बिबट्या दिसल्याच्या चर्चा रंगू लागल्या काही ठिकाणी प्रत्यक्षात बिबट्या दिसला असे ग्रामस्थ सांगतात दोन दिवसापूर्वी कराड तालुक्यातील वडोली निळेश्वर येथील निळेश्वर मंदिर परिसरात

वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामध्ये शेळी ठार

सुभाष नारायण पवार यांच्या कालवड याच्यावर हल्ला झाला होता ती जागीच ठार झाली होती गोट्यामध्ये त्यानंतर लगेच दोन-तीन दिवसातच अक्षय शंकर पवार यांच्या गोट्यात हल्ला करून शेळी जागीच ठार केली घटनास्थळी सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थांच्या मध्ये एकच भीतीचे वातावरण निर्माण झाले घटनास्थळी वन खात्याच्या वनरक्षक सानिका घाडगे यांनी पंचनामा केला पुन्हा एकदा परिसरामध्ये चर्चा रंगली आहे ग्रामस्थांनी वन खात्याने या प्राण्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली आहे पंचनामा व्यतिरिक्त ठोस भूमिका घ्यावी अशी भूमिका ग्रामस्थ मांडत आहेत

सातारा पोलिसांच्या कार्याचे कौतुक; महालक्ष्मी आधार फाउंडेशनकडून विशेष पोलीस महानिरीक्षकांची भेट



सातारा : कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. सुनील फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा पोलिसांचे कार्य समाधानकारक व प्रभावीपणे सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. सातारा हा ऐतिहासिक जिल्हा असून, येथे कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलीस अधीक्षक श्री. तुषार दोषी तसेच अप्पर पोलीस अधीक्षक सौ. वैशाली कडूकर यांच्या नेतृत्वाखाली सक्षमपणे पार पडत आहे.

याच पार्श्वभूमीवर सातारा तालुका पोलीस स्टेशन येथील शिवतेज हॉलमध्ये महालक्ष्मी आधार फाउंडेशनच्या वतीने विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. सुनील फुलारी यांची भेट घेण्यात आली. यावेळी फाउंडेशनच्या संस्थापिका सौ. प्रतिभा सुनील शेलार यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करत पोलीस दलाच्या कार्याबद्दल आभार व्यक्त केले.

या प्रसंगी सातारा जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा — पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, उप पोलीस अधीक्षक व सर्व अधिकारी-कर्मचारी — समन्वयाने व जबाबदारीने काम करत असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच सातारा पोलिसांचे नाव कोणत्याही कारणामुळे बदनाम होऊ नये, ही अपेक्षा व्यक्त करत संबंधित बाबींवर लक्ष देण्याबाबत निवेदनही सादर करण्यात आले.

कार्यक्रमात अप्पर पोलीस अधीक्षक सौ. वैशाली कडूकर यांच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व पोलीस विभागांशी समन्वय साधत, पोलिसांचे मनोबल वाढविण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय असल्याचे यावेळी सांगण्यात आले.दरम्यान, विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. सुनील फुलारी यांनीही सातारा पोलिसांच्या कार्याचे कौतुक करत, पुढील काळातही असेच उत्तम कार्य सुरू ठेवण्याचे आवाहन केले.

ङश्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालयाची शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी; ''शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण' ' मध्ये ९२.३८% गुणांसह 'उत्कृष्ट' श्रेणी प्राप्त!



परभणी : येथील श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालयाने शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने घेण्यात आलेल्या 'शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण' ('मैस्र्म्हैं'स्महौंग्नं'ल्लू -ँ') मध्ये महाविद्यालयाने ९२.३८३ गुण मिळवून 'उत्कृष्ट' ('मैंत्तहू') श्रेणी प्राप्त केली आहे. विद्यापीठाच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीने महाविद्यालयातील विविध विभागांची ऑनलाइन पद्धतीने पाहणी केली होती. यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासकीय कामकाज, पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांसाठी राबवले जाणारे उपक्रम आणि संशोधन क्षेत्रातील कामगिरी या सर्व बाबींचा प्रामुख्याने विचार करण्यात आला. समितीने महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासावर समाधान व्यक्त करत ९२.३८३ गुणांकन बहाल केले आहे. महाविद्यालयाला मिळालेल्या या यशामुळे परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सांघिक प्रयत्नांमुळेच हे यश मिळाल्याचे महाविद्यालयाकडून सांगण्यात आले. या यशामुळे भविष्यात महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावण्यास मदत होणार आहे. सदरील लेखापरीक्षणासाठी प्राचार्य डॉ.के.राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ संजय दळवी, सहसमन्वयक डॉ रवींद्र राख, डॉ जितेंद्र पुल्ले, डॉ. रवी बर्डे, डॉ, राजू शेख, डॉ अजय कुऱ्हे, डॉ. दैवशाला कामठाने, डॉ अलका कौसडीकर तसेच महाविद्यालयातील इतर सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयाच्या या उत्तुंग यशाबद्दल श्री गुरु बुद्धीस्वामी शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष श्री प्रमोद एकलारे, सचिव श्री अमृतराज कदम, सहसचिव प्रा गोविंद कदम, कोषाध्यक्ष श्री उत्तमराव कदम, प्राचार्य डॉ के. राजकुमार, उपप्राचार्य डॉ. शिवसांब कापसे, डॉ. गजानन कुरुंदकर, पर्यवेक्षक श्री उमाकांत मिटकरी, उपप्राचार्य राजेश बाहेती यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणजे तारक शक्ती- विवेक वळसे पाटील



प्रतिनिधी/ कैलास गायकवाड

लोणी : घोडेगाव ता. आंबेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाला संविधानाच्या माध्यमातून समता बंधुता एकता स्वातंत्र्य हे मूलभूत हक्क देऊन प्रत्येक नागरिकाला सक्षम केले आहे म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर हे देशातील १४० कोटी जनतेची तारक शक्ती आहे असे गौरवोद्गार जिल्हा परिषद चे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी काढले

घोडेगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष युगप्रवर्तक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक आणि संविधान भवन समितीच्या वतीने महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ बी जयंती मोहत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी सकाळी ११ वाजता ध्वजारोहण व पूजापाठ करण्यात येऊन महामानव डॉ बाबासाहेब यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली त्या नंतर ग्रामीण रुग्णालय घोडेगाव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले पंचायत समितीचे सभापती मा कैलास बुवा काळे यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचा उद्घाटन करण्यात आले त्यानंतर दुपारी ४ वाजता महापुरुषांच्या प्रतिमांचे भव्य मिरवणूक संपूर्ण घोडेगाव शहरातून ढोलताशांच्या गजरात भिमगीतांच्या सुरेल आवाजात मिरवणूक काढण्यात आली यात तालुक्याच्या विविध भागातून शेकडो भीमसैनिक सहभागी होऊन आनंदाने नाचत होते यावेळी भव्य मिरवणूक अहिल्यादेवी होळकर चौकात आल्या नंतर भव्य शाही मंडपात पाहुण्यांचे आगमन झाले यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक पांडुरंग गायकवाड यांच्या ऑर्केस्ट्रा मधून भीमगीतांचा जल्लोष झाला त्यांनतर महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखिका व्याख्याती कु निलम इचके यांचे व्याख्यान झाले व्याख्यान नंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आंबेगाब भूषण या राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण करण्यात आले यात सामाजिक कृषी कला क्रीडा सांस्कृतिक पत्रकारिता विधी वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचे पुरस्कार देऊन अभिनदन केले त्यात नाशिक विभागाचे महानिरीक्षक बी जी शेखर, निर्मता दिग्दर्शक शंकर बारवे, जागतिक सर्पदंश तज्ञ डॉ सदानंद राऊंत, महाराष्ट्र शासन समाजभूषण पुरस्कार प्राप्त कैलासगायकवाड, प्रियांका हांडे, प्रकाश सोनवणे, जालिंदर शेवाळे, अविनाश पवार, राजू हिंगे, निलम इचके, ज्योती गोरडे, सोनल भवरी, सिद्धेश पिंगळे आदि मान्यवराना सत्कार करण्यात आला यावेळी जिल्हापरिषदेचे उपाध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक प्रवीण शिंदे, सभापती कैलास काळे ,उपसभापती ज्योतीताई पारधी , कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निलेश थोरात, युगप्रवर्तक प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतमराव खरात, जिल्हा परिषद सदस्य सुवर्णाताई दरेकर, जेष्ठ पत्रकार डी के वळसे, साखर कारखान्याचे संचालक सीताराम लोहट, ज्ञानेश्वर अस्वारे, विठ्ठल टिंगरे, रवी फाले, खंडू थोरात, एकनाथ वाव्हळ, कविता खरात, क्रांतीताई गाढवे, ज्योती घोडेकर, रत्नाताई गाडे, मंजुषा प्रशांत माटे, शरद भालेराव, सुनील देठे आदि मान्यवर उपस्थित होते यावेळी युगप्रवर्तक या संस्थेच्या लोगो चे व माहितीपटाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकबाबत सकारात्मक चर्चा संपन्न !

जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर !!



सातारा : येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्य संरक्षित स्मारक हे केवळ राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळेच प्रलंबित आहे.पालकमंत्री नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयात धडक मारून निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांना निवेदन देऊन सकारात्मक चर्चा करण्यात आली.त्यांनी जागेवरूनच सर्वत्र संबंधितांना संपर्क साधून प्रलंबित कामास गती मिळेल.अशी कार्यवाही केल्याने शिष्टमंडळ समाधान व्यक्त करीत आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे प्राथमीक शिक्षण घेत आसताना ते आपल्या कुटूंबासमवेत येथे १८९६ ते १९०४ या कालावधीत सि. स. नं. १ मधील ब्रिटीश कालीन इमारतीमध्ये राहीले होते.त्यांच्या बालपणीच्या पाऊल खुणा सदरच्या इमारतीत असल्याने त्या इमारतीप्रती एक आदराची भावना आहे.तेव्हा त्या इमारतीचे स्मारकात रूपांतर व्हावे.अशी अनेक वर्षापासूनची आंबेडकर जनतेची मागणी आहे. मात्र, ही मागणी निव्वळ जिल्ह्यातील लोकप्रतीनीधींच्या मनात राजकीय इच्छाशक्तीचा आभाव असल्यानेच हा प्रश्न गेली २२ वर्षे प्रलंबीतच असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष चंद्रकांत खंडाईत यांनी जाहीर निषेध नोंदवला आहे.

आंबेडकरी अनुयायी यांच्या मागणीचा आणी सदर इमारतीच्या जागेचा डेव्हलपमेंटची प्रक्रीया चालू होणार असल्याने सदर पुरातन इमारतीचा ठेवा मोडीत निघणार असल्याचे २००४ साली आंबेडकरी आणुयायी यांच्या लक्षात आल्यानंतर मोठे जनआंदोलन समितीच्यावतीने करण्यात आले होते.त्यामुळे स्मारकाच्या मागणीला बळ आले. २००७ मध्ये सदर जागेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्य संरक्षीत स्मारकाची घोषणा करण्यात येऊन तसे गॅझेंट प्रसिद्ध करण्यात आले होते. तरीसूद्धा जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वाने मात्र पाठबळ दिल्याचे जानवले नाही.नि, विरोधही केला नसल्याचे दिसून येत होते.मात्र सदर स्मारकास १०१४ मध्ये मुर्तस्वरूप येऊ लागल्याचे दिसू लागले होते. मात्र, राजकीय हस्तक्षेप झाल्याचे जाणवले. सदर स्मारकाचा प्रश्न न्याय प्रवीष्ठ झाला असून या सर्व बाबींचा विचार करता मुळातच जिल्ह्यातील राजकीय लोकप्रतीनीधींनी या विषयात २००४ साला पासून ते आज अखेर एकदा ही जिल्हाधीकारी कार्यालयासमोरील आंदोलनास भेट देऊन या स्मारकाचा प्रश्न समजाऊन घेऊन सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिलेले नाही. त्यामूळे खऱ्याआर्थाने राजकीय नेतृत्वाच्या इच्छाशक्तीचा आभावच दिसून येत आहे.असे आपले मत झाले आहे. स्मारकाचे काम गेली १२ वर्षे झाली न्यायप्रविष्ट आहे. ते सोडवण्याकरीता शासन, प्रशासन, सांस्कृतीक विभाग, विधी व न्याय विभाग, सरकारी वकील यापैकी कोण्हीही प्रामाणिक प्रयत्न केलेला नाही. बाहेरच्या लोकप्रतीनीधींनी विधानसभा व विधानपरीषदेत सदरचा प्रश्न उपस्थित केलेला होता.मात्र, जिल्ह्यातील एकाही लोकप्रतीनीधींनी एक शब्द ही काढला नाही.गेल्या २२ वर्षात जिल्ह्यातील दोन मुख्यमंत्री, एक उपमुख्यमंत्री व चार कॅबिनेट मंत्री झाले असतानाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्य संरक्षीत स्मारकाचा प्रश्न प्रलंबीत असल्याने जर कामास गती मिळाली नाही. तर समितीच्यावतीने लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन केले जाणार आहे. अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. यावेळी अध्यक्ष चंद्रकांत खंडाईत यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळात सचिव गणेश कारंडे, बी.एल.माने, तानाजी नागटीळक, श्रीरंग वाघमारे, विश्वास सावंत ॲड.विलास वहागावकर, प्रकाश खटावकर, दादासाहेब केंगार, सुनील त्रिम्बके, अनिल वीर आदी मान्यवर उपस्थित होते.

नगरपरिषदेच्या हुकूमशाही धोरणाच्या विरोधात हलगी बजाओ आंदोलन



प्रतिनिधी/ रुपेश एंगडे

हिंगोली : वसमत नगर परिषद प्रशासनाकडून सध्या सुरू असलेले दलितवाणी प्रेस ते कातनेश्वरकर कॉम्प्लेक्स पर्यंतचे सुरु असलेले सि.सी. रोडचे काम हे लोकशाही मूल्यांची पायमल्ली करणारे आणि सामान्य नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणारे आहे, वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने केवळ कागदी घोडे नाचवून तक्रारकर्त्यांची क्रूर थट्टा केली आहे त्यामुळे प्रशासनाच्या या आंधळ्या आणि बहिऱ्या कारभाराचा जाहीर निषेध करत खालील मागण्या करत हलगी बजाओ अंदोलन करण्यात आले. १) रस्ते रुंदीकरणात अडथळा ठरणारी आणि राजकीय वरदहस्त असलेली अतिक्रमणे तात्काळ जमीनदोस्त करा. अतिक्रमण न काढता रस्ता बनवणे म्हणजे भ्रष्टाचाराला खतपाणी घालणे आहे त्यामुळे त्या अतिक्रमनावर बुलडोजर फिरवा. २)तक्रारकर्त्यांना खोटी आश्वासने देऊन दिशाभूल करणाऱ्या वसमत नगर परिषदेच्या मुख्याधिकारी, नगर रचनाकार व बांधकाम अभियंता यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात यावी. ३) सि.सी. रोडचे काम तांत्रिक निकष धाब्यावर बसवून तक्रार कर्त्याच्या हरकती विचारात न घेता हुकूमशाही पद्धतीने सुरू असलेल्या अतिक्रमणाचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत हे नियमबाह्य काम जैसे थे वैसे स्थितीत स्थगित करावे. ४)पारदर्शकतेचा अभाव आणण्यासाठी रस्ते कामाचे अंदाज पत्रक आणि नकाशा सार्वजनिक करावा,

हे आंदोलन केवळ एक औपचारिकता नसून, प्रशासकीय झोप उडवणारा 'आक्रोश आहे त्यामुळे शहरातील सर्व प्रमुख रस्त्यावतील अतिक्रम हटवून वसमत शहरराला अतिक्रमण मुक्त करावे. असे निवेदन महामाहीम राज्यपाल यांना उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हा उपाध्यक्ष आनंद खरे यांच्या वतीने देण्यात आले आहे.

घरकुल अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याची लाभार्थीची मागणी.!

yeebOekeâece ceššefjÙe}ÛÙee

प्रतिनिधी/ आरती कारंजेकर

देवळी : सध्या सर्वत्र गोरगरीब जनतेसाठी शासनामार्फत प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना इंदिरा आवास योजना आदी योजना राबवली जात आहे. ग्रमिण भागात प्रधानमंजी घरकुल योजनेंतर्गत दोन लाखाचे अनुदान देण्यात येते त्यामध्ये एक लाख वीस हजार रुपये धनादेशाद्वारे २८ हजार रुपये रोजगार हमी योजनेंतर्गत तर सौर ऊर्जा ३५हा१५ असे ५० हजार एकूण दोन लाखाचे स्वरूप आहे.तर रमाई योजनेंतर्गत दिड लाख रुपयांपर्यंत घरकुल अनुदान मिळत असते दुसरीकडे आजच्या महागाईमुळे गोरगरीब नागरिकांचे घर बांधण्याचे स्वप्नांना महागाईचा अडसर निर्माण होत आहे. सध्या घरकुल बांधकाम करण्याकरीता शासनाकडून मिळणारे घरकुलांचे अनुदान हे अल्प प्रमाणात असून महागाई



वाढल्यामुळे घरकुलाचे अनुदानात शासनाकडून सहानुभूतिपूर्वक विचार करून वाढ करण्याची मागणी लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

बांधकाम कामगाराचा रोज मटेरियलचे वाढलेले भाव रेतीची अडचन यामुळे अनेकांचे घराचे स्वप्र अधुरेच राहत असल्याचे चित्र गौळ परिसरात पहावयास मिळत आहे.

सध्या स्थितीत बांधकामांसाठी आवश्यक असलेली विटांच्या दरात मोठी वाढ झालेली आहे. विटांचे दर सात ते आठ हजार रुपयाला हजार

वीट असा दर आहे. तर लोखंडाचे दर ५८०० ते ६००० पर्यंत आहेत. बांधकामासाठी लागणारी वाळूचे दर ४ ते ५ हजार ग्रास प्रमाणे आहेत. या सर्वांना एकत्र जोडणाऱ्या सिमेंटचे दर साडेतीनशे वर झाल्याने सर्वसामान्यांचे घर बांधण्याचे स्वाप्न भंग होत आहे. शासनाने सध्या तालुका व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात घरकुलांना मंजुरी दिली आहे. बांधकाम करण्यासाठी लागणारी वाळू विटा मुरूमचे भावात वाढ झाली आहे. त्यामुळे अहवाच्या सव्वा भावाने तस्करांकडून वाळू विकत घ्यावी लागत आहे. मुरुमही तस्करांच्या माध्यमातूनच मिळतो. सध्या महागाई खूप प्रचंड प्रमाणात वाढले आहे.

जीवनावश्यक साहित्य, खाद्य वस्तुच्या किमंती भरमसाठ वाढल्या आहे.सर्वसामान्य आणि गोरगरिबांना मोठ्या काटकसरीने संसार चालवावा लागत आहे. सध्या अनेक नागरिकांची जुनी घरे धोकादायक होत असल्याने सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. अशावेळी आपलेही हक्काचे घर असावे असे मनोमन विचार प्रत्येक व्यक्तीला येतो आहे, प्रत्येक नागरिक आपल्या आर्थिक स्थितीनुसार घर बांधण्याच्या तयारीत असतात. शासनही प्रत्येकाजवळ हक्काचे घर असावे यासाठी अडीच लाखांपर्यंत अनुदान देते. हे अनुदान जरी असलं तरीही घर बांधणे सर्वसामान्यांच्य आवाक्या बाहेर गेले आहे. बांधकाम साहित्याच्या वाढलेल्या किमती पाहत अनेक नागरिक हे आपले घर बांधकाम अर्ध्यावरच थांवत असल्याचे प्रकार ग्रामीण भागात दिसून येत आहेत, जे घर पाच लाखांपर्यंत पूर्ण व्हायचे त्यासाठ आता दहा लाख मोजावे लागत आहेत मजुरीपासून ते लोखंडापर्यंत सर्वच वस्तू महागल्या आहेत. सध्या तालुक्यात वाळू लिलाव रखडल्याने तालुक्यातील बाळू तस्करांकडून अवाच्यासवाच्या भावात वाळू विकत घ्यावी लागत आहे. शासनाने लवकरात लवकर वाळूचू टेंडर तोडून वाळूची होत असलेली लूट थांबून सर्वसामान्यांना मुबलक दरात वाळू उपलब्ध करून द्यावी, अशी मागणं सर्वसामान्य जनतेतून होत आहे.

तडाख्याच्या उन्हात चिमुकल्यांना दिलासा; 'द कारंजा क्लब' कडून अंगणवाडीला सिलिंग फॅन भेट



कारंजा (घाडगे): सध्या उन्हाळ्याचा पारा चांगलाच वाढला असून सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. अशातच शहरातील वार्ड क्रमांक १६ मधील अंगणवाडीमध्ये सोयीसुविधांचा अभाव असल्याने लहान मुलांना प्रचंड उकाड्याचा त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेता, शहरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या 'द कारंजा क्लब' मित्र परिवाराने तत्परता दाखवत या अंगणवाडीला सिलिंग फॅन भेट दिला आहे.

वार्ड क्रमांक १६ मधील या अंगणवाडीला स्वतःची हक्काची इमारत नाही. त्यामुळे ही अंगणवाडी सध्या एका भाड्याच्या खोलीत भरविली जाते. या खोलीत पंखा किंवा कुलरची कोणतीही व्यवस्था नसल्याने, तिथे येणाऱ्या चिमुकल्यांना या तीव्र उन्हाळ्यात घामाघूम व्हावे लागत होते. ही समस्या 'द कारंजा क्लब'च्या सदस्यांच्या निदर्शनास आली.

??अंगणवाडीतील मुलांची गैरसोय होऊ नये आणि त्यांना हवेशीर वातावरणात शिक्षण घेता यावे, या उद्देशाने 'द कारंजा क्लब'च्या वतीने तातडीने एक नवीन सिलिंग फॅन उपलब्ध करून देण्यात आला. या उपक्रमामुळे अंगणवाडीतील उकाड्याचा प्रश्न सुटला असून चिमुकल्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. ?'द कारंजा क्लब' च्या या संवेदनशील कार्याचे वार्डातील नागरिकांनी आणि पालकांनी विशेष कौतुक केले आहे.

संकटाच्या काळात किंवा गरजेच्या वेळी मदतीला धावून येण्याच्या आपल्या परंपरेला क्लबने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. या वेळी मोहन किनकर, गौरव सोमकुवर, दीपक चौधुले, रवी ढोले, किसना चौधरी, जयंत दाभने, शैलेश बागडे , मिलिंद चौधरी, उपस्थित होते

संत - महापुरुष हे एका जातीपुरते मर्यादित नाही

संघपाल महाराज यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी/ आरती कारंजेकर

देवळी : देवळी तालुक्यातील सोनेगाव (बाई) येथे भीम जयंती कार्यक्रमात सर्व महापुरुषांची जयंती उत्सव कार्यक्रम उत्साहाने पार पडला.या वेळी जयंती उत्सव समिती तथा गावकरी मंडळी तर्फे समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सप्तखंजेरीवादक राष्ट्रीय कीर्तनकार संघपाल महाराज यांच्या सदाबहार सुमधुर पंचरंगी कीर्तनाने या कार्यक्रमाचा समारोप झाला. याप्रसंगी राष्ट्रीय प्रबोधनकार तुकाराम दास घोडे महाराज उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या सप्ताहामध्ये अनेक. रचनात्मक.विधायक असे उपक्रम राबविण्यात आले. १७ एप्रिल ला सुप्रसिद्ध भीमदास नाईक प्रबोधनकार कव्वाल यांचा प्रबोधनाचा कार्यक्रम सादर झाला. तर समारोपीय कार्यक्रम राष्ट्रीय कीर्तनकार संघपाल महाराज पवनुरकर यांच्या हस्ते पार पडला. त्यांनी आपल्या कीर्तनातून ग्रामगीता आधारित संत महापुरुषांचे देशहित सेवाकार्य .व्यसनमुक्ती.बुवाबाजी . बेटी बचाव बेटी पढाव. अंधश्रद्धा निर्मूलन. समता शांती बंधूंभाव इत्यादी सामाजिक विषयावर आपल्या सप्त खंजिरी च्या प्रबोधनाने आपल्या विनोदी शैलीत रसिकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमातून त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज संत गाडगे महाराज यांच्या विचारा सोबतच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर. क्रांतिज्योती महात्मा फुले छत्रपती शिवाजी महाराज. संत ज्ञानेश्वर माऊली . संत शिरोमणी तुकोबाराय. ईतर संत महापुरुषांचा विचार आपल्या कीर्तनातून प्रभावीपणे मांडला आणि ग्रामस्थांना एकत्र अशा सुंदर उपक्रमातून एकत्र येण्याचे आवाहन करून या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रवंदनेने करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे आयोजन नियोजन समितीचे अध्यक्ष सर्वश्री अण्णाजी गोटे पोलीस पाटील. माजी उपाध्यक्ष विनोद नाखले. सचिव किशोर लोखंडे तथा सदस्य बचत गट .महिला उपासक विद्यार्थी मित्रपरिवार बौद्ध पंच कमेटी. मातोश्री रमाबाई महिला मंडळ .आणि सर्व ग्रामवासी शारदा भजन मंडळ. नवदुर्गा भजन मंडळ. संत श्री गजानन महाराज भजन मंडळ. विठू माऊली भजन मंडळ. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरी भजन मंडळ. यशस्वी ते साठी गावकरी मंडळींनी उपस्थित राहून सहकार्य केले.

देवळी येथे तालुका स्तरीय कार्यशाळा संपन्न.!



प्रतिनिधी/ योगेश काबंळे

गौळ : सार्वजनिक आरोग्य विभाग तालुका आरोग्य अधिकारी देवळी च्यावतिने २३ एप्रिल रोजी पंचायत समिती देवळी सभागृह येथे गटविकास अधिकारी प्रफुल्ल लोखंडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोनाली मामीलवार यांच्या मार्गदर्शनात तालुका स्तरीय कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळेस विस्तार अधिकारी प्रमोद बिडवाईक , मुरार आरोग्य पर्यवेक्षक प्रमोद धुडे यांची उपस्थिती होती. ग्रामपंचायत प्रशासक, ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी, सामुदायिक आरोग्य अधिकारी,आरोग्य सहाय्यक सहायिका , गटप्रवर्तक तालुकास्तरीय कार्यशाळेत सहभागी झाले होते.

कार्यशाळाचे मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी प्रफुल्ल लोखंडे यांनी माझ गाव आरोग्य संपन्न गाव या मोहिमेची प्रथम प्राधान्यांनी अंमलबजावणी करावी असे मार्गदर्शन केले.

ते पुढे म्हणाले पंचायत विभागाच्या कार्यावर व आरोग्य विभागाच्या कार्यावर वेगवेगळे गुण आहेत त्यामुळे दोन्ही विभागांनी समन्वय साधून ही मोहीम यशस्वी करण्यात यावी जिथे अडचण असेल तिथे वरिष्ठांशी संपर्क साधा असे प्रफुल्ल लोखंडे यांनी सांगितले.

शासन निर्णयाप्रमाणे तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर मोनाली मामीलवार यांनी कार्यशाळेला मार्गदर्शन करून पिपीटी प्रात्यक्षिक करून प्रशिक्षण दिले. पंचायत विभागातील प्रशासक सरपंच ग्रामसेवक व आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी सूक्ष्म नियोजन करून दिलेल्या कार्यक्रमांनुसार कार्यवाही करावी

१००३ गुण दोन्ही विभागांनी मिळवावे असे आव्हानही तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर मोनाली मामीलवार यांनी केले.

पंचायत व आरोग्य विभागाच्या टीम द्वारे कसे नियोजन करणार याबाबत मनोगत घेण्यात आले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील आरोग्य सहाय्यक बाबाराव कनेर यांनी केले तर आभार आरोग्य सहाय्यक दिलीप उटाणे यांनी केले कार्यशाळेला मोठ्या संख्येने प्रशासक ग्रामसेवक आरोग्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विकी करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद

प्रतिनिधी/ दिलीप येवले

नागपूर : नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २२/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, देशी दारू तसेच इतर साहित्य असा एकुण ७१,९४०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपी नामे १) धीरसिंग बद्री पवार वय ६० वर्ष रा जुनापाणी, २) सुरेश बाबाराव धांडे वय ४९ वर्ष रा. जलालखेडा यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन जलालखेडा येथे आरोपी नामे १) अभिषेक ज्ञानेश्वर कुमरे वय २५ वर्ष रा. घोगरा ता. नरखेड आणि २) निकी राजेद्र सोमकुवर वय २७ वर्ष रा. खडकी ता. नरखेड याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपी नामे १) धनराज शामराव गजभिये वय ६३ वर्ष रा. खरसोली तह. नरखेड जिल्हा नागपूर, २) अभय चंद्रशेखर बांगर वय २१ वर्ष रा. मन्नाथखेडी तह. नरखेड ह. मु. खरसोली तह. नरखेड यांचेवर १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपी क्र. १ भानु व्यंकटेश रंगु वय ३५ वर्ष रा प्लॉट नं ५ संत नरहरी लेआउट कळमेश्वर आणि १ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ असे एकुण २ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी सलीम रहमान शाहा वय ५१ वर्ष रा. कोदेगाव याचेवर १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन केळवद येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपी नामे १) आयान साबिर सय्यद वय २१ वर्ष या वार्ड क १२ सावनेर ता सावनेर आणि २) लक्ष्मण सुखलाल साहु वय २४ वर्ष रा वार्ड क ११ सावनेर, ता सावनेर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन रामटेक येथे महीला आरोपी हीचे वर ०१ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे आरोपी नामे १) आझादसिंग हरभजनसिंग बावरी वय २३ वर्ष रा रूईखैरी, २) नामदेव देवराव मरकाम वय ७५ वर्ष रा तुमडी आणि आरोपी क्र ३) राजु रामकृष्ण वरकाडे वय ५२ वर्ष रा तुमडी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे आरोपी नरेश महादेव माहुरे वय ४० वर्षे रा. मातामदीर वार्ड हिंगणघाट ता. हिंगनघाट जि वर्धा याचेवर १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन वेलतुर येथे आरोपी अंकुश बाबाजी बावने वय ४६ वर्ष रा. वार्ड क ०४ पचखेडी ता कुही याचेवर १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन वेलतुर येथे आरोपी अंकुश बाबाजी बावने वय ४६ वर्ष रा. वार्ड क ०४ पचखेडी ता कुही याचेवर १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन उमरेड येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद अशा २२ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १८ गुन्हे दाखल केले आहे.

नमुद कारवाईत एकुण १) १०४ लिटर मोहाफुल गावठी दारू, २) १६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा ३) ५०४० मिली देशी दारू, ३६० मिली विदेशी दारू, तसेच इतर साहित्य असा ७१,९४०/- रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला

अंदोरी येथे बीबीएफ लागवड तंत्रज्ञान व टोकन यंत्राने पेरणी प्रात्यक्षिक

रुंद वरंब्या वर पिकांची लागवड करण्याचे कृषि विभागाचे आवाहन



प्रतिनिधी/ योगेश काबंळे

गौळ : नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत हवामान अनुकूल तंत्रज्ञान मोहीम च्या कार्यशाळेत बीबीएफ लागवड तंत्रज्ञान व टोकन यंत्राने पेरणी याच्याबद्दल अंदोरी येथे प्रात्यक्षिक घेण्यात आले. कार्यशाळेत गावातील पोलीस पाटील श्री हेमंत ढोले, माजी सरपंच जय वाकडे, तंत्रज्ञान समन्वयक स्नेहा इंगोले, गावातील प्रगतिशील महिला शेतकरी उपस्थित होते. प्रात्यक्षिक श्री प्रमोद देहारे यांच्या शेतात घेण्यात आले. कुमारी अश्विनी डहाके समूह सहाय्यक प्रात्यक्षिकाचे नियोजन केले. येणाऱ्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी बीबीएफ लागवड तंत्रज्ञानाने पेरणी करावी ,शून्य मशागत व मुख्य पिकात आंतरपीक घ्यावे अशी जनजागृती करण्यात आली.

प्रथमच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या द्वितीय लग्नाचा वाढदिवस व सामाजिक समता समारोप

हिंगणघाट: शारदा कबीर अर्थात सविता आंबेडकर आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या लग्नाचा आज वाढदिवस संपन्न झाला. त्यांना आदराने माईसाहेब म्हणायचे. बाबासाहेबांच्या आयुष्यातील शेवटच्या क्षणी आणि महत्वाच्या टप्प्यात सविताताईंचा प्रवेश होतो. स्वतंत्र भारताचे मंत्री म्हणून त्यांनी जी काही कामगिरी केली त्या सर्व ऐतिहासिक क्षणांच्या साक्षीदार या माईसाहेब होत्या. कायदेमंत्री म्हणून, राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून बाबासाहेबांनी घेतलेल्या प्रचंड मेहनतीमागे असलेले अदृश्य हात हे माईसाहेबांचेच तर होते.हिंदू कोडबिल आल्यांनतर देशभरात त्यांच्या विरोधात होत असलेल्या निदर्शनावेळी आणि लोकसभा निवडणूकीत पराभव झाल्यानंतर त्यांना मानसिक आधार देणाऱ्या माईसाहेबच आंतरजातीय विवाह केला होता. पुरोगामी चळवळीशी नातं सांगणाऱ्या कुटुंबातून त्या आल्या होत्या. बाबासाहेबांच्या आजारपणात त्यांना काय हवं, काय नको याबद्दल त्या काळजी घेत होत्या. बाबासाहेबांच्या पश्चात आपण त्यांना आपल्यापासून दूर लोटलं.



त्यांच्यात आणि आपल्यात एवढी दरी निर्माण केली, जी आजपर्यंत भरून निघालेली नाही. बाबासाहेबांच्या मृत्यूची चौकशी लावली गेली, त्यात माईसाहेबांना दोषी ठरवलं गेलं. आपलं उभं आयुष्य ज्या महामानवासाठी बलिदान केलं त्या त्यागमूर्तीवर आपण शंका घेतली. 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या बाबासाहेब लिखित शेवटच्या ग्रंथात प्रस्तावनेत बाबासाहेब लिहितात, 'माझे आयुष्य ८ वर्षांनी वाढविण्याचे श्रेय हे सविताचे आहे'. नंतरच्या आवृत्तीत बाबासाहेब लिखित ही प्रस्तावना वगळली गेली. जाणीवपूर्वक तसा प्रयत्न केला गेला. बाबासाहेबांच्या धर्मांतर चळवळीत बौद्ध धम्म स्वीकारणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. कर्मकांड नाकारून, आपलं ब्राह्मणत्व नाकारून त्या बाबासाहेबांचं बोट धरून बुद्धाच्या सम्यक मार्गानं त्या निघाल्या होत्या. बाबासाहेबांच्या पश्चात जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी माईसाहेबांना राज्यसभेवर प्रतिनिधी म्हणून येण्याची विनंती केली. परंतु बाबासाहेबांच्या विचारांशी प्रतारणा होईल असं काम करायला त्यांनी तीनही वेळा नकार दिला. एवढी मोठी संधी चालून आली असतानाही आपली तत्वे त्यांनी सोडली नाही. रिडल्सच्या आंदोलनातही माईसाहेबांचा महत्वाचा सहभाग राहिला. प्रकृती साथ देऊ न शकल्याने नंतर त्या चळवळीपासून दूर झाल्या खऱ्या, पण विचारांशी मात्र कायम प्रामाणिक राहिल्या. म्हणून त्यांच्या कार्याचे महत्त्व जाणून त्यांच्या लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने घोषित केलेल्या सामाजिक समता सप्ताह त्याचा समारोप सुद्धा करण्यात आला.त्या दिवशी नवनिर्वाचित नगरपरिषद सदस्य यांचा सत्कार सत्कार करण्यात आला सर्व नगरसेवक सोनू गवळी, अतुल नंदागवळी, विकी वाघमारे, विक्रांत भगत, वैशाली काळे ,पल्लवी बाराहाते यांचा जाहीर सत्कार करून पुष्पगुच्छ व संविधानाची प्रत देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आदरणीय. आर एल सुटे ज्येष्ठ अधिवक्ता हिंगणघाट हे उपस्थित होते.

अस्मल गवळाऊ गायीच्या दुधापासून तयार होणाऱ्या पदार्थांची चाखायला मिळणार नागरिकांना चव

प्रतिनिधी/ सिद्धार्थ सोमकुवर

कारंजा : केंद्र शासन पुरस्कृत ब्रिटीश कालीन डेरी फार्म(हेटीकुंडी) येथील गवळाऊ पाशु पैदास व संवर्धन केंद्र यांचे सोबत मिळून उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान वर्धा गवळाऊ गायीच्या दुधापासून तूप,पनीर,खवा उत्पादन करणार असून आता याची चव सर्वांना चाखायला मिळणार आहे.

सदर नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्याच्या अनुषंगाने काल अभियानाच्या प्रकल्प संचालक श्रीमती.वैशाली रसाळ,श्री. जगदीश बुक्तारे

उपआयुक्त, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा वर्धा,श्री.संजय खोपडे सर

सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन



विभाग, जिल्हा वर्धा श्री.प्रतीक मुनेश्वर जिल्हा व्यवस्थापक उपजीविका,श्री.ऋषिकेश दोडेवर सर यांनी फेरी फार्म येथील प्रकल्पाला भेट देऊन अधीक्षक श्रीमती.चित्रा राऊत मॅडम यांचे सोबत सदर कामासंदर्भात सविस्तर चर्चा केली.

अभियानाच्या माध्यमातून ग्राम संघ, उत्पादक गट यांना दूधापासून विविध पदार्थ तयार करणे तसेच शेणापासून धूप बत्ती,अगरबत्ती, गांडूळ खत तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार असून त्या बद्दल महिलांसोबत अधिकारी यांनी हेतीकुंडी येथे बैठक घेऊन उद्योग संदर्भात सविस्तर चर्चा व मार्गदर्शन केले.

सध्या घडीला बाजारात गवळाऊ गाईच्या नावाखाली भेसळ युक्त पदार्थांची विक्री होत असून यावर कुठे तरी आळा बसावा व नागरिकांना उत्तम दर्जाचे पदार्थ मिळावे व यातून महिलांना सुद्धा रोजगार मिळावा असे अनेक उद्देश समोर ठेऊन सदर उद्योग सुरू करण्यासाठी महिलांनी आपली इच्छा दर्शविली आहे.

याच दरम्यान अधिकारी यांनी उमेद च्या माध्यमातून काजळी येथे सुरू करण्यात आलेल्या गांडूळ खत प्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली.व ग्राम संघाला पुढील वाटचालीसाठी सुभेच्या दिल्यात.ठाणेगाव येथील अवजार बँकेला भेट देऊन साहित्याची पाहणी केली.व व्यवसाय सुरू करण्यात सूचना देण्यात आल्यात.

भेटी दरम्यान तालुका अभियान व्यवस्थापक श्री.हेमंत काकडे,तालुका व्यवस्थापक श्री.प्रमोद सोमकुळे,शाम काळे,प्रभाग समन्वयक श्रीमती.शुभांगी चरडे व अभियानाचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

पुलगाव शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्याच्या उभारणीची मागणी



पुलगाव : पुलगाव शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्याची उभारणी करण्यात यावी, या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने नगरपरिषदेकडे निवेदन सादर करण्यात आले.

शहरातील शिवभक्त नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्याच्या उभारणीची मागणी करीत आहेत. यापूर्वी नगरपरिषदेमार्फत भूमिपूजन देखील करण्यात आले होते, मात्र अद्यापपर्यंत प्रत्यक्ष उभारणीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली.

नगरपरिषद प्रशासनाने तातडीने आवश्यक ठराव मंजूर करून पुतळा उभारणीची प्रक्रिया सुरू करावी तसेच यासाठी स्वतंत्र समिती गठीत करून नियोजनबद्ध कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा, शिवसेना आपल्या पद्धतीने आंदोलन उभारेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या वेळी वर्धा जिल्हा प्रमुख आशिष पांडे, पुलगाव शहर प्रमुख राकेश कचवाह, विधानसभा प्रमुख नरेश ठाकूर, शहर संघटक प्रकाश मेटे, हनुमंत बोन्द्रे, युवासेना तालुका अधिकारी रोहित निगम, ॲड. विद्याधर माथाने, नरेश कलमकर, सुधाकर किल्लोर, साहिल दळवी, हरीश राउत, बाबराव पवार, बबलू हरदाव्या, अकील शेख यांच्यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना ; ज्येष्ठांनो चला..... तीर्थ दर्शनाला ।



प्रतिनिधी/ दिलीप येवले

नागपूर : राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी, अर्थात ज्यांचे वय ६० वर्षांपेक्षा अधिक आहे, अशा व्यक्तींसाठी राज्य शासनाने भारतातील तीर्थक्षेत्रांना यात्रा करण्याची संधी उपलब्ध केली आहे. मा योजनेचे नाव आहे 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना'. सामाजिक न्यायमंत्री श्री. संजय शिरसाट याच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये मा. मंत्री महोदयांनी मे महिन्यात बौध्दगया येथे तीर्थ दर्शन करण्या करीता ट्रेन सोडण्यात येणार असल्याचे सांगीतले. यासाठी अर्ज करण्याची अंतीम तारीख ३० एप्रिल २०२६ आहे. या योजनेसाठी ६० वर्षावरील नागरिकांनी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रासमोर, श्रध्दानंदपेठ, नागपूर-२२ येथे अर्ज दाखल करायचे आहेत. ३० हजार रुपयापर्यंत या योजनेतून लाभ दिला जाणार आहे..

कोणाला लाभ मिळणार अॅड

या योजनेच्या लाभासाठी महाराष्ट्र राज्यातील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. त्याचे वय वर्षे ६० व त्यावरील ज्येष्ठ नागरिक असावे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन रक्कम २.५० लाख रुपयापेक्षा जास्त नसावे. अर्जासोबत ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याने पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा जास्त जुने नसावे).

असा करा अर्ज

या योजनेचा लाभ मिळण्याकरिता ऑनलाईन अर्ज सादर करावा. अर्जासोबत लाभार्थ्याचे आधार कार्ड, रेशनकार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र, प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल). सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयापर्यंत असणे अनिवार्य) किंवा पिवळे, केशरी रेशनकार्ड, वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक तसेच सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र आवश्यक राहील. मोबाईल अॅपवर, सेतू केंद्रात हा अर्ज करता येईल. अर्जदाराला यासाठी स्वतः उपस्थित रहाणे आवश्यक आहे. ऑनलाईन फोटो यासाठी हवा आहे.

यांना लाभ घेता येणार नाही

ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत असे सदस्य पात्र ठरणार नाहीत. तथापि २.५० लाख रुपयापर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी पात्र ठरतील. थोडक्यात अडीच लाखावरील उत्पन्न असणारे, गंभीर आजाराने ग्रस्त असणारे ज्येष्ठ नागरिक अपात्र ठरतील.

अशी होणार लाभार्थ्यांची निवड

जिल्हास्तरीय समिती लाभार्थ्यांची निवड करेल. अर्जदारांच्या संख्येसह त्या जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अधिभार देऊन कोटा निश्चित केला जाईल, विहित कोट्यापेक्षा जास्त अर्जाच्या उपलब्धतेवर आधारित लॉटरीद्वारे (लॉट्सचे संगणकीकृत ड्रॉ) प्रवाशांची निवड केली जाईल.

प्रवास प्रक्रिया

जिल्हास्तरीय समितीने निवडलेल्या प्रवाशांची यादी आयुक्त, समाज कल्याण पुणे यांचेकडे सुपूर्द केली जाईल. निवडलेल्या प्रवाशांची यादी प्रवासासाठी अधिकृत टुरिस्ट कंपनी / एजन्सीला देण्यात देईल. नियुक्त अधिकृत टुरिस्ट कंपनी/एजन्सी दूरवरील प्रवाशांच्या गटाच्या प्रस्थानाची व्यवस्था करेल. प्रवाशांच्या प्रवासासाठी आवश्यक त्या सुविधा आणि कोणत्या सुविधा देण्यात याव्यात याचा निर्णय राज्य शासन घेईल. सर्व यात्रेकरूंना प्रवासासाठी नियोजित स्थळी त्यांच्या स्वखर्चाने पोहोचावे लागेल..

७५ वर्ष यासाठी सवलत

७५ वर्षावरील अर्जदाराला त्याच्या जीवनसाथी किंवा सहाय्यक यापैकी एकाला त्याच्यासोबत नेण्याची परवानगी असेल. अर्जदाराने त्याच्या अर्जात तसे नमूद करणे आवश्यक आहे. ७५ वर्षावरील अर्जदाराच्या जोडीदाराचे वय ६० वर्षांपेक्षा कमी असेल तरीही प्रवासी सहाय्यक अर्जदारासोबत प्रवास करू शकेल.

थोडक्यात योजना

लाभार्थ्याचे वय ६० वर्षे पूर्ण असावे. लाभार्थ्याचे उत्पन्न २.५० लाखापेक्षा जास्त नसावे. रहिवासी प्रमाणपत्र, आधार कार्ड/मतदान कार्ड, इंदिरा गांधी, राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याचा पुरावा, ज्येष्ठ नागरीक प्रमाणपत्र जोडणे आवश्यक, वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे २ फोटो, उत्पन्नाचे प्रमाणपत्र किंवा पिवळे/केशरी रेशन कार्ड, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल नंबर, हमीपत्र आवश्यक आहे.

किसान क्रेडिट कार्ड, पशुपालकांना तीन लाखांपर्यंतचे खेळते भांडवल

व्यवसायाला चालना देण्यासाठी तरुणांना चांगली संधी



प्रतिनिधी/ दिलीप येवले

नागपूर : राज्यातील पशुपालक शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' मोहीम प्रभावीपणे राबवली जात आहे. या योजनेतून दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढीपालन आणि कुक्कुटपालनासाठी ३ लाख रुपयांपर्यंतचे खेळते भांडवल आकर्षक व्याज सवलतीसह उपलब्ध करून दिले जाणार आहे. ज्या पशुपालकांकडे अद्याप किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण दिले जाईल. दूध उत्पादक संस्थेची हमी असल्यास हीच मर्यादा ३ लाखांपर्यंत वाढवता येते. तसेच, आधीच कार्ड असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या पतमर्यादित वाढ करून घेण्याची सुविधा आहे. या योजनेसाठी सर्व पशुधनाची 'भारत पशुधन' प्रणालीवर नोंदणी असणे अनिवार्य आहे. १०० पेक्षा कमी दुधाळ जनावरे, ५०० पेक्षा कमी शेळ्या-मेंढ्या किंवा ठराविक मर्यादित कुक्कुटपालन असणारे पशुपालक यासाठी पात्र आहेत. कर्ज घेतल्यापासून एका वर्षाच्या आत त्याची संपूर्ण परतफेड करणे बंधनकारक असून, अर्जदाराने इतर कोणत्याही शासकीय अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

ग्रामीण भागात पशुधन व्यवसायाला चालना देण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयात किंवा १९६२ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा. जिल्ह्यातील पशुपालकांना या योजनेच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट विभागाने ठेवले आहे. डॉ. नितीन फुके, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर

अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ३ वाहनासह ३० ब्रास रेती एकुण ९१ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी/ दिलीप येवले

नागपूर : पोलीस स्टेशन पारशिवनी दिनांक २२/०४/२०२६ रोजी पारशिवनी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वाघोडा शिवारात पेंच नदीचे पात्रातुन अवैधरीत्या विनापरवाना रेतीचे उत्खनन करून ट्रक द्वारे डोरली मार्गे सिंगोरी कडे वाहतुक करीत आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा सिंगोरी येथे डोरली ते सिंगोरीकडे जाणाऱ्या सिमेंट रोडवर नाकाबंदी केली असता संशयित वाहन क्रं १) टाटा १२ चक्का ट्रक क्रमांक एम. एच.४०/ डी.सी. ६३६३, २) टाटा १२ चक्का ट्रक क्रमांक एम. एच ४०/ डी.सी ६७८६ आणि वाहन क्रं ३) टाटा १२ चक्का विना क्रमांचा ट्रक मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन कं १ चा चालक आरोपी क्रं १) नामे सोनुलाल मंगलसिंग उईके, वय ३२ वर्ष, रा. ग्राम बंजी पोस्टे अहमदपुर, तह. बिछीया, जि. मंडला, राज्य मध्यप्रदेश, ह.मु नागपुर, वाहन कं २ चा चालक आरोपी क्रं २) नर्बदे छुन्नुलाल यादव, वय ३० वर्ष, रा. ग्राम बरखेडा, पोस्टे औरई, तह. अंजनीया, जि. मंडला, राज्य मध्यप्रदेश आणि वाहन कं ३ चा चालक आरोपी क्रं ३) नामे राकेशकुमार अशोककुमार केराम, वय २२ वर्ष, रा. ग्राम सारस डोळी, पोस्ट बिछीया, तह बिछीया, जिल्हा मंडळा, राज्य मध्यप्रदेश, ह.मु नागपुर हे मिळुन आले. पोलीसांनी आरोपी चालकांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. तिन्ही वाहनाचा मालक आरोपी कं ४) मनिषराव चौधरी, रा. वाडी नागपुर हा असल्याची माहीती पोलीसांना समजली. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद तिन्ही वाहन अनुक्रमे १) टाटा १२ चक्का ट्रक क्रमांक एम. एच.४०/डी.सी. ६३६३ किंमती ३०,००,०००/- रूपये व त्याचे डाल्यामध्ये १० ब्रास रेती किंमती ५०,०००/- रूपये २) टाटा १२ चक्का ट्रक क्रमांक एम.एच. ४०/डी.सी. ६७८६ किंमती ३०,००,०००/- रुपये व त्याचे डाल्यामध्ये १० ब्रास रेती किंमती ५०,०००/- रुपये ३) टाटा १२ चक्का विना क्रमांचा ट्रक किमंती ३०,००,०००/- रुपये व त्याचे डाल्यामध्ये १० ब्रास रेती किमंती ५०,०००/- रुपये असा एकुण ०३ ट्रक किंमती ९०,००,०००/- रुपये व एकुण ३० ब्रास रेती किंमती १,५०,०००/- रुपये असा एकुण ९१,५०,०००/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नमुद आरोपी वाहन चालक १) सोनुलाल मंगलसिंग उईके, वय ३२ वर्ष, रा. ग्राम बंजी पोस्टे अहमदपुर, तह. बिछीया, जि. मंडला मध्यप्रदेश, ह.मु नागपुर २) नर्बदे छुन्नुलाल यादव, वय ३० वर्ष, रा. ग्राम बरखेडा, पोस्टे औरई, तह. अंजनीया, जि. मंडला, मध्यप्रदेश ३) राकेशकुमार अशोककुमार केराम, वय २२ वर्ष, रा. ग्राम सारस डोळी, पोस्ट बिछीया, तह बिछीया, जिल्हा मंडळा, मध्यप्रदेश, ह.मु नागपुर आणि आरोपी वाहन मालक कं ४) मनिषराव चौधरी रा. वाडी नागपुर यांच्या विरूध्द पोस्टे पारशिवनी येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं, सहकलम ४८(८), ४८ (७) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिन्ही वाहन चालक आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पारशिवणी पोलीसांची कामगिरी

निधन वार्ता : कामठीमध्ये शोककळा



अनुसया भीमराव बावनकुळे

कामठी येथील पेरकीपुरा, तहसील कार्यालयासमोर वास्तव्यास असलेल्या अनुसया भीमराव बावनकुळे (वय ८१) यांचे आज सकाळी अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्या लोकशाहीर वस्ताद स्व. भीमराव बावनकुळे यांच्या पत्नी तसेच शाहीर राजेंद्र भीमराव बावनकुळे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने कन्हान व कामठी परिसरात शोककळा पसरली आहे. साधी, मनमिळाऊ व कुटुंबवत्सल अशी त्यांची ओळख होती. समाजातील अनेकांशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध जपले होते. त्यांच्या जाण्याने बावनकुळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिचितांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांचे पार्थिव आज दुपारी ३.३० वाजता कन्हान शांती घाट येथे अंत्यसंस्कारासाठी नेण्यात येणार आहे.



सरस्वती हायस्कूल व जूनियर कॉलेज बोखारा येथे जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी/ दिलीप येवले

कोराडी : सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, बोखारा येथे आज जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका व प्राचार्या लता वाघ उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात पुस्तक पूजनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करणारी भाषणे, कविता व सादरीकरणे केली. पुस्तक हे ज्ञानाचे भांडार असून वाचनामुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे मार्गदर्शन संचालिका प्राचार्या लता वाघ यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. या प्रसंगी शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वाचन प्रेरणा अभियान, पुस्तक प्रदर्शन तसेच कथा वाचन स्पर्धा यांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाला उपमुख्याध्यापिका डॉ सुवर्णा जांभुळकर, ग्रंथपाल, प्रा. रोठे उपस्थित होते कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन वर्ग नववीची सुचित्रा रहाटे तर प्रास्ताविक सोज्वळ जुमडे ने केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांचे स.शि विनोद चिडाम यांनी आभार मानले.

> डिजिटल युग असले तरी पुस्तक हे ज्ञानाचे भांडार असून वाचनामुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते त्यामुळे प्रत्येकाने रोज पुस्तकाचे दहा पाने तरी वाचावीत असे प्रतिपादन केले-
>
> **संस्थेच्या संचालिका प्राचार्य लता वाघ**

नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यांवर ०२ गुन्हे नोंद

नागपूर : दिनांक २२/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन रामटेक आणि बुटीबोरी यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सटापटट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण १५३३/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत मौजा मनसर येथे आरोपी नामे अमर मंगल ईडपाची, वय २७ वर्ष, रा. वार्ड क. ०१, नित्यानंद नगर मनसर, त. रामटेक हा कागदावर बरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ९१०/- रूपये असा एकुण ९१३/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत मौजा बुटीबोरी मच्छी मार्केटचे मागे येथे आरोपी नामे अविनाश सुभाष डुंभरे, वय ५५ वर्ष, रा. प्रभाग क ०५, बुटीबोरी हा कागदावर बरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ६२०/- रूपये असा एकुण ६२०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांचा सातारच्या ऐतिहासिक भूमीमध्ये जाहीर सभा .



सातारा : सातारा जिल्ह्याच्या ऐतिहासिक भूमी मधे महाराष्ट्राच्या मराठी अस्मितेचे शिवसैनिक आणि महाराष्ट्राचा बुलंद आवाज सातारा जिल्ह्याचे ढाण्या वाघ म्हणून ओळखले जाणारे विद्यमान उपमुख्यमंत्री मा.नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेब यांची गांधी मैदान येथे जाहीर सभा घेण्यात आली सभेत उपस्थित डबल महाराष्ट्र केसरी मा.शिव सेना नेते पै.चंद्रहार पाटील साहेब नागठाणे गावचे सुपुत्र पै.सुरेश पतंगराव साळुंखे ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती विद्यमान सदस्य श्री.संतोष लक्ष्मण साळुंखे. यांच्या हस्ते श्री.बळीराम बाजीराव साळुंखे यांची कराटे या खेळात चेन्नई येथे झालेल्या गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये त्यांची नोंद झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला

कामठी मेट्रोच्या शिरपेचात मानाचा तुरा: 'ड्रॅगन पॅलेस' ची प्रतिकृती असलेले भव्य मेट्रो स्टेशन लवकरच साकारणार!

अॅड. सुलेखाताई कुंभारे यांचा महामेट्रोकडे यशस्वी पाठपुरावा; कामाला वेग देण्याचे प्रशासनाचे आदेश



नागपूर दिलीप येवले: कामठी शहराचा चेहरामोहरा बदलणाऱ्या मेट्रो रेल्वे प्रकल्पात आता एक जागतिक दर्जाचे आकर्षण जोडले जाणार आहे. जागतिक शांततेचे प्रतीक असलेल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या धर्तीवरच आता मेट्रो स्टेशनची उभारणी केली जाणार असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी माजी राज्यमंत्री अॅड. सुलेखाताई कुंभारे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. या स्टेशनला 'ड्रॅगन पॅलेस' असे नाव देऊन तिथे ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या वास्तुशिल्पाची हुबेहूब प्रतिकृती साकारली जाणार आहे.

२०१८ मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ड्रॅगन पॅलेस टेम्पल येथे आयोजित कार्यक्रमात

'ड्रॅगन पॅलेस टेम्पल' मेट्रो स्टेशन आता एका आगळ्यावेगळ्या रूपात साकारणार असल्याची संकल्पना मांडली होती. त्याच धर्तीवर अॅड. सुलेखाताईं कुंभारे पाठपुरावा करीत आहेत.

भाविकांच्या सोयीसाठी अॅड.सुलेखाताईं कुंभारे यांचा आग्रही निर्धार

ड्रॅगन पॅलेस टेम्पल येथे दरवर्षी ५ लाखांहून अधिक देशी-विदेशी भाविक आणि पर्यटक भेट देतात. या मोठ्या संख्येला केंद्रस्थानी ठेवून, येथील मेट्रो स्टेशन केवळ प्रवासाचे साधन न राहता ते एक पर्यटन स्थळ म्हणून विकसित व्हावे, असा मानस अॅड.सुलेखाताई कुंभारे यांनी व्यक्त केला होता. त्यांच्याच निरंतर पाठपुराव्यामुळे आता ऑटोमोटिव्ह चौक ते कन्हान या मार्गावरील या विशेष स्टेशनच्या कामाला विशेष गती प्राप्त झाली आहे.

महामेट्रो कार्यालयात तातडीची बैठक

नुकतीच ?ड. सुलेखाताई कुंभारे यांनी महामेट्रोच्या मुख्य कार्यालयात महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांची भेट घेऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या बैठकीत त्यांनी खालील प्रमुख मागण्यांवर भर दिला:

प्रतिकृतीचे बांधकाम: मेट्रो स्टेशनचे स्ट्रक्चर हे ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या शैलीतच असावे, जेणेकरून शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर पडेल.

कामात वेग: कन्हानपर्यंतच्या मेट्रो मार्गाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून जनतेला दिलासा द्यावा.

भव्य स्टेशनची उभारणी: ५ लाख भाविकांची ये-जा सुलभ व्हावी यासाठी येथे मोठे आणि सुसज्ज स्टेशन उभारण्यात यावे.

कामठीच्या विकासाला नवी दिशा

अॅड. सुलेखाताई कुंभारे यांच्या या प्रयत्नांमुळे कामठीतील मेट्रो प्रकल्प आता एका नवीन उंचीवर पोहोचणार आहे. महामेट्रो प्रशासनाने त्यांच्या मागण्यांची दखल घेत तांत्रिक प्रक्रिया जलद करण्याचे आणि स्टेशनच्या कामाला लवकरच प्रत्यक्ष सुरुवात करण्याचे आश्वासन दिले आहे. या यशामुळे कामठी परिसरात आनंदाचे वातावरण असून, पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक रोजगारालाही मोठी उभारी मिळणार आहे.

'ड्रॅगन पॅलेस मेट्रो स्टेशन हे कामठीच्या सौंदर्यात आणि सोयीत भर टाकणारे ठरेल. या स्टेशनच्या माध्यमातून भाविकांना जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी आमचा पाठपुरावा निरंतर सुरू आहे आणि लवकरच हे काम पूर्णत्वास जाईल.'

— ?ड. सुलेखाताई कुंभारे

काल बुधवार दिनांक २२ एप्रिल रोजी संपन्न झालेल्या या बैठकीत ?ड सुलेखाताई कुंभारे आणि महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या सह

कामठी मेट्रोच्या शिरपेचात मानाचा तुरा: 'ड्रॅगन पॅलेस'ची प्रतिकृती असलेले भव्य मेट्रो स्टेशन लवकरच साकारणार!

अॅड. सुलेखाताई कुंभारे यांचा महामेट्रोकडे यशस्वी पाठपुरावा; कामाला वेग देण्याचे प्रशासनाचे आदेश

कामठी : कामठी शहराचा चेहरामोहरा बदलणाऱ्या मेट्रो रेल्वे प्रकल्पात आता एक जागतिक दर्जाचे आकर्षण जोडले जाणार आहे. जागतिक शांततेचे प्रतीक असलेल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या धर्तीवरच आता मेट्रो स्टेशनची उभारणी केली जाणार असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी माजी राज्यमंत्री अॅड. सुलेखाताई कुंभारे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. या स्टेशनला 'ड्रॅगन पॅलेस' असे नाव देऊन तिथे ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या वास्तुशिल्पाची हुबेहूब प्रतिकृती साकारली जाणार आहे.

२०१८ मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ड्रॅगन पॅलेस टेम्पल येथे आयोजित कार्यक्रमात 'ड्रॅगन पॅलेस टेम्पल' मेट्रो स्टेशन आता एका आगळ्यावेगळ्या रूपात साकारणार असल्याची संकल्पना मांडली होती. त्याच धर्तीवर ?ड. सुलेखाताईं कुंभारे पाठपुरावा करीत आहेत.भाविकांच्या सोयीसाठी अॅड.सुलेखाताईं कुंभारे यांचा आग्रही निर्धार

ड्रॅगन पॅलेस टेम्पल येथे दरवर्षी ५ लाखांहून अधिक देशी-विदेशी भाविक आणि पर्यटक भेट देतात. या मोठ्या संख्येला केंद्रस्थानी ठेवून, येथील मेट्रो स्टेशन केवळ प्रवासाचे साधन न राहता ते एक पर्यटन स्थळ म्हणून विकसित व्हावे, असा मानस ?ड.सुलेखाताई कुंभारे यांनी व्यक्त केला होता. त्यांच्याच निरंतर पाठपुराव्यामुळे आता ऑटोमोटिव्ह चौक ते कन्हान या मार्गावरील या विशेष स्टेशनच्या कामाला विशेष गती प्राप्त झाली आहे.

> 'ड्रॅगन पॅलेस मेट्रो स्टेशन हे कामठीच्या सौंदर्यात आणि सोयीत भर टाकणारे ठरेल. या स्टेशनच्या माध्यमातून भाविकांना जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी आमचा पाठपुरावा निरंतर सुरू आहे आणि लवकरच हे काम पूर्णत्वास जाईल.'
>
> अॅड.सुलेखाताई कुंभारे

महामेट्रो कार्यालयात तातडीची बैठक

नुकतीच अॅड. सुलेखाताई कुंभारे यांनी महामेट्रोच्या मुख्य कार्यालयात महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांची भेट घेऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या बैठकीत त्यांनी खालील प्रमुख मागण्यांवर भर दिला:प्रतिकृतीचे बांधकाम: मेट्रो स्टेशनचे स्ट्रक्चर हे ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या शैलीतच असावे, जेणेकरून शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर पडेल.

कामात वेग: कन्हानपर्यंतच्या मेट्रो मार्गाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून जनतेला दिलासा द्यावा.भव्य स्टेशनची उभारणी: ५ लाख भाविकांची ये-जा सुलभ व्हावी यासाठी येथे मोठे आणि सुसज्ज स्टेशन उभारण्यात यावे.

कामठीच्या विकासाला नवी दिशा

अॅड. सुलेखाताई कुंभारे यांच्या या प्रयत्नांमुळे कामठीतील मेट्रो प्रकल्प आता एका नवीन उंचीवर पोहोचणार आहे.

महामेट्रो प्रशासनाने त्यांच्या मागण्यांची दखल घेत तांत्रिक प्रक्रिया जलद करण्याचे आणि स्टेशनच्या कामाला लवकरच प्रत्यक्ष सुरुवात करण्याचे आश्वासन दिले आहे. या यशामुळे कामठी परिसरात आनंदाचे वातावरण असून, पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक रोजगारालाही मोठी उभारी मिळणार आहे.

काल बुधवार दिनांक २२ एप्रिल रोजी संपन्न झालेल्या या बैठकीत अॅड.सुलेखाताई कुंभारे आणि महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या सह प्रोजेक्ट प्रमुख राजेश त्यागी, आर्कीटेक्ट हबीब खान उपस्थित होते.

मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोनला मंजुरी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मंत्रालयात मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा विकास समितीची बैठक



मुंबई: मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोन अशा एकूण १८,१३०.५५ कोटी रुपयांच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली. नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन महत्त्वाकांक्षी द्रुतगती महामार्गांच्या कामांच्या भूसंपादनासाठी लागणारे कर्ज हुडकोकडून घेण्यास तसेच नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी टप्पा २ मधील १०६३ कोटी रूपयांच्या कामांच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूरी दिली.

मंत्रालयात मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा विकास समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता यासह वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोनचा सुमारे ६९ लाख लोकांना फायदा होणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोन अशा एकूण १८,१३०.५५ कोटी रुपयांच्या कामांना मंजूरी देण्यात आली. या मार्गिकेची लांबी ३४.२१ किमी आहे, ज्यामध्ये १९ स्थानकांचा समावेश आहे. टप्पा १ कापूरबावडी ते धामणकर नाका, टप्पा २ धामणकर नाका ते दुर्गाडी, मार्गिका ५अ दुर्गाडी – कल्याण – उल्हासनगर या प्रकल्पामुळे ठाणे, भिवंडी, कल्याण आणि उल्हासनगर या भागातील सुमारे ६९ लाख लोकांना फायदा होणार असून प्रवास वेळेत ४०-५०ङ्म बचत होईल. या प्रकल्पासाठीच्या आवश्यक परवानगीसाठी केंद्र शासन व संबधित विभागाकडे गतीने कार्यवाही करावी.

तीन द्रुतगती महामार्ग प्रकल्पांचे 'प्रकल्प कार्यान्वित करण्याचे वेळापत्रक' निश्चित करण्याच्या सूचना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन द्रुतगती महामार्ग या प्रकल्पांचे 'प्रकल्प कार्यान्वित करण्याचे वेळापत्रक' निश्चित करण्याच्या सुचना तसेच निविदा प्रसिद्धी, निविदा अंतिम करणे आणि प्रकल्प पूर्णतेचा कालावधी निश्चित करावा. या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाकरिता हुडकोकडून कर्ज उभारण्याच्या प्रस्तावावर वित्त विभागाशी समन्वय साधून तातडीने मार्ग काढावा. विदर्भातील दळणवळण आणि उद्योगांना चालना देण्यासाठी हे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे असल्याने सहा वर्षात हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कार्यवाही करावी.

नागपूर-गोंदिया द्रुतगती महामार्ग या महामार्गाची एकूण लांबी १६२.५७७ कि.मी. असून, प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत १९,५८२.१९ कोटी रुपये आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ३,१६२.१८ कोटी रुपयांच्या खर्चास, भंडारा-गडचिरोली द्रुतगती महामार्ग ९४.२४१ कि.मी. लांबीच्या या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ९३१.१५ कोटी रूपये, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती महामार्ग हा प्रकल्प २०४.७९९ कि.मी. लांबीचा असून याच्या भूसंपादनासाठी २,३५३.९४ कोटी रुपयांच्या प्रशासकीय खर्चाला मंजुरी देण्यात आली.

नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी १०६३ कोटी रूपयांच्या कामांच्या प्रस्तावाला मंजूरी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना उत्तम सोयी-सुविधा मिळण्यासाठी प्रस्तावित पायाभूत सुविधांची कामे गतीने करावीत. भाविकांसाठी वाहनतळ , पाणीपुरवठा, विद्युतविभाग, आरोग्य विभाग, घनकचरा व्यवस्थापन, मुख्य नियंत्रण कक्ष यासाठी १०६३ कोटी रूपयांच्या कामांचे प्रस्तावाला मंजूरी देण्यात आली असून ही कामे गतीने पूर्ण करावीत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, नगरविकासचे डॉ.एच गोविंदराज, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, कुंभमेळा विकास प्राधिकरणचे आयुक्त शेखर सिंह यावेळी उपस्थित होते.

नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर तीन द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना हुडकोकडून कर्ज घेण्यास मान्यता

नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या नियोजनाची कामे गतीने करा

भारतीय वायुसेनेचे (ङ्क) इंद्रप्रस्थ महाविद्यालयांमध्ये जनजागृती अभियान



प्रतिनिधी/ दैनिक जनप्रभात

वर्धा: देशभक्तीची भावना रुजवण्यासाठी आणि भारतीय हवाई दलात करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी, भारतीय वायुसेनेच्या वतीने Induction Publicity Exhibition Vehicle (IPEV) Road Drive* अंतर्गत इंद्रप्रस्थ न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज वर्धा येथे विशेष 'एअरफोर्स भरती जनजागृती कार्यक्रम' यशस्वीरित्या संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे स्क्वॉडर्न लीडर रजन अरोरा यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेस हार अर्पण तथा दीप प्रज्वलन करून करण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख वक्ते तथा मार्गदर्शक स्क्वॉडर्न लीडर रजन अरोरा, प्राचार्य डॉ. आशिष ससनकर, डॉ. नितीन इंदूरवाडे, वर्धा युथ फेस्ट प्रतिनिधी श्री. अभिषेक उरकुडे उपस्थित होते.याप्रसंगी भारतीय हवाई दलातील वरिष्ठ अधिकारी स्क्वॉडर्न लीडर रजन अरोरा यांनी युद्धकाळात आणि शांततेच्या काळात राष्ट्राला दिलेल्या सेवेचा एक प्रशंसनीय आणि अनुकरणीय विक्रम प्रस्थापित करणाऱ्या केंद्रीय हवाई दलाच्या कर्तृत्वाचा समृद्ध इतिहास उलगडून दाखविला. एअर कमांड काळानुसार विकसित झाली आहे आणि हवाई साधनांच्या उपयोगक्षमतेत एक आमूलाग्र बदल घडवून आला आहे. भारतीय वायुसेनेत (Indian Air Force - IAF) सुखोई, डसॉल्ट राफेल, एचएएल तेजस, मिराज-२०००, मिग-२९(MiG-२९), C-१७ ग्लोबमास्टर, IL-७६, आणि ण-१३०ठ सुपर हर्क्युलस, अपाचे , चिनूक , आणि Mi-१७ विविध प्रकारची अत्याधुनिक लढाऊ, वाहतूक आणि टेहळणी विमाने कार्यरत आहेत.

हे भारतीय संरक्षण दलाच्या मुख्य विभागांपैकी एक असून, देशाच्या हवाई क्षेत्राचे रक्षण करण्याची जबाबदारी यावर आहे. हवाई दलाने हाताळलेल्या काही प्रमुख मोहिमांमध्ये काश्मीर मोहीम १९४७-४८, भारत-चीन संघर्ष १९६२, भारत-पाकिस्तान युद्ध १९६५, भारत-पाकिस्तान युद्ध १९७१, ऑपरेशन पवन १९८६ (श्रीलंका), ऑपरेशन सफेद सागर १९९९ (कारगिल) आणि पूर्व लडाखमधील ऑपरेशन स्नो लेपर्ड २०२० (गलवान खोरे) आदींची माहिती दिली. भारतीय हवाई दलात (Indian Air Force) अग्निवीर वायू (Agniveer Vayu) पदांसाठी अर्ज प्रक्रिया, भरती रॅली, ऑनलाइन परीक्षा, वैद्यकीय चाचणी आणि शारीरिक क्षमता चाचणी (Physical Standards) याविषयी माहिती दिली. १२वी उत्तीर्ण (विज्ञान शाखेतून - गणित, भौतिकशास्त्र आणि इंग्रजी) आणि एकूण ५०ङ्म गुणांसह उत्तीर्ण असलेले अविवाहित तरुण आणि तरुणी या भरतीसाठी पात्र आहेत तसेच ळझएए परीक्षेच्या माध्यमातून हवाई दलात कसा प्रवेश होतो, याविषयींचे सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. संदीप पेटारे यांनी मानले. कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक गण व विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

विद्यार्थ्यांना देशसेवेचे आवाहन : स्क्वॉडर्न लीडर रजन अरोरा

नागरिकांना मिळणार घरबसल्या 'ई-संजीवनी' टेलिमेडिसिन सेवा

वर्धा (जिमाका): जिल्ह्यातील नागरिकांना घरबसल्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'ई-संजीवनी' ही टेलिमेडिसिन सेवा प्रभावीपणे सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून नागरिकांना मोफत आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला ऑनलाइन पद्धतीने मिळणार आहे. नागरिकांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले यांनी केले आहे.

'ई-संजीवनी' ही टेलिमेडिसिन सेवा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून

लाभ घेण्याचे आरोग्य विभागाचे आवाहन

नागरिकांनी पूज्ेः//हिरार्न्हिग्दज्.ग्ह? या संकेतस्थळावर जाऊन 'ङ्गूिगहू ुङ्गूिग्दह' पर्यायावर क्लिक करून नोंदणी करावी. मोबाईल क्रमांक नोंदवून ओटीपीद्वारे पडताळणी केल्यानंतर रुग्णांना आपली वैद्यकीय माहिती भरता येते. आवश्यक असल्यास जुने अहवाल, रिपोर्ट किंवा डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन अपलोड करण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे.

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर 'उार्हीू ङ्गूिगहू घ्ु ऊदवह' या पर्यायाद्वारे रुग्णांना आयडी व टोकन मिळते. त्यानंतर उपलब्ध डॉक्टरांची निवड करून व्हिडिओ कॉलद्वारे थेट सल्ला घेता येतो. या सुविधेमुळे ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना विशेष लाभ होणार आहे. घरबसल्या मोफत डॉक्टरांचा सल्ला, वेळ व प्रवास खर्चाची बचत, तज्ज्ञ डॉक्टरांशी थेट संपर्क तसेच फॉलो-अप व



नियोजित तपासणी सुलभ होणार आहे. ही सेवा सकाळी ९ ते दुपारी १ आणि दुपारी १.४५ ते सायंकाळी ५ या वेळेत उपलब्ध आहे, असे आरोग्य विभागाने कळविले आहे.

विषारी औषध प्राशन केल्याने इसमाचा मृत्यू



वर्धा : विषारी औषध प्राशन केल्याने इसमाचा मृत्यू झाला. हि घटना दिग्रज येथे घडली. राजेंद्र नामदेवराव चंदनखेडे (वय ४०) रा. दिग्रज सिंदी (रेल्वे) असे मृताचे नाव आहे. राजेंद्र चंदनखेडे यांनी विषारी औषध प्राशन केल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सेवाग्राम रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी सिंदी (रेल्वे) पोलिसांनी नोंद केली.

नगराध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळ यांच्या हस्ते भूमिका चौबेचा सत्कार

अॅड. अजित धोटे यांच्या पुढाकाराने झाला सत्कार



प्रतिनिधी/ दैनिक जनप्रभात

वर्धा: विद्यार्थी जीवनामध्ये आत्मसात केलेल्या कला विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाला कारणीभूत ठरतात. या कलांमध्ये महत्त्वाची असणारी म्हणजे वक्तृत्व कला. याच वक्तृत्व कलेला आत्मसात करून पहिल्याच वर्षी राष्ट्रीय स्तरावरच्या आंतरविद्यापीठीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रतिष्ठेचा द्वितीय पुरस्कार प्राप्त करणारी बजाज विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. भूमिका चौबे हिचा वर्धा शहराचे प्रथम नागरिक व नगराध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सत्कारासाठी ?ड. अजित धोटे यांनी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेऊन रुपये पाच हजार रोख व सन्मान चिन्ह देऊन भूमिकाचे कौतुक केले. यावेळी भूमिकाला वक्तृत्व कलेमध्ये मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक प्रा. राजेश डंभारे हेही आवर्जून उपस्थित होते. भूमिकाने अल्पावधीतच कठोर परिश्रम आणि सतत शिकत राहण्याची इच्छाशक्ती या गुणांच्या बळावर वक्तृत्व क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात तिने अनेक प्रतिष्ठेच्या वक्तृत्व स्पर्धांचे विजेतेपद प्राप्त केले. तिच्या या कामगिरीने प्रभावित होऊन अॅड. अजित धोटे यांनी इतर विद्यार्थ्यांना सुद्धा प्रेरणा मिळावी आणि त्यांनी वक्तृत्व कलेच्या क्षेत्रात पुढे यावे या उद्देशाने हा सत्कार घडवून आणला.

याप्रसंगी भूमिकाचे कौतुक करताना नगराध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळ म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खूप गुणवत्ता आहे. या विद्यार्थ्यांकडे योग्य लक्ष दिले तर भूमिका सारखे अनेक विद्यार्थी पुढे येतील. भूमिका ही वक्ता म्हणून नावारूपाला आलेली आहे. तिने आपल्या कलेचा वापर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची विचारधारा पुढे नेऊन युवा पिढीपुढे एक नवीन आदर्श निर्माण करण्यासाठी करावा.

भूमिकाच्या या सत्काराप्रसंगी तिच्या परिवारातील रवी उपाध्याय, रितू तिवारी, राहुल चौबे आणि इतर सदस्यांची उपस्थिती होती.

वर्धा लोकसभा क्षेत्रातील विविध रेल्वे गाडयांचे थांबे मंजूर करावे

माजी खासदार रामदास तडस यांची मागणी



माजी खासदार रामदास तडस यांच्या निवेदनाची दखल घेऊन केन्द्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांचे केन्द्री रेल्वे मंत्री श्री. अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी.

आज दिनांक २३ एप्रील २०२६ झेडआरयुसीसी बैठकीमध्ये सदर मुद्दा उपस्थित करण्याच्या सुचना झेडआरयुसीसी सदस्य प्रणव जोशी यांना सुचना

प्रतिनिधी/ दैनिक जनप्रभात

वर्धा: कोविड-१९ या महामारीनंतर रेल्वे सेवा विस्कळीत झाली होती. आज रेल्वे सेवा पुर्वपदावर आली असुन कोविड-१९ मध्ये वर्धा लोकसभा क्षेत्रातील वर्धा, हिंगणघाट, पुलगांव, धामणगांव, चांदूर, सेवाग्राम, सिंदी रेल्वे, तुळजापूर, वरुड, मोर्शी तसेच नव्याने निर्मीत झालेले रेल्वे स्थानक श्री. क्षेत्र रिध्दपूर येथील अनेक गाडयांचे रेल्वे थांबे स्थगीत करण्यात आले होते. प्रवासी वर्ग, सामान्य नागरिकांना रेल्वे थांबे स्थगीत झाल्यामुळे फार मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

या सोबतच सामान्य जनतेकरिता अत्यंत सोईची असलेली सेवा म्हणजे सवारी रेल्वे गाडी/पॅसेंजर रेल्वे गाडी या देखील कोविड-१९ नंतर बंद झालेल्या आहे. या सेवा बंद झाल्यामुळे फक्त वर्धा नाही तर नागपूर व भुसावळ रेल्वे मंडळातील नागरिक प्रवासी त्रस्त आहे त्यामुळे सदर थांबे मिळावे यासाठी, तसेच पुलगांव येथे १२८३३/१२८३४ अहमदाबाद-हावडा-अहमदाबाद एक्सप्रेस, १२८३३/१२८३४ अहमदाबाद-हावडा-अहमदाबाद एक्सप्रेस, हिंगणघाट येथे १२११३/१२११४ नागपूर-पुणे-नागपूर गरीबरथ एक्सप्रेस, १२९७६/१२९७५ जयपूर-म्हैसुर-जयपूर एक्सप्रेस, ४.२२८४७/२२६४८ कोरबा-तिरुअनंतपुरम-कोरबा एक्सप्रेस, २२६४५/२२६४६ इंदौर-तिरुअनंतपुरम इंदौर एक्सप्रेस, १२७७१/१२७७२ रायपुर-सिकंदराबाद-रायपुर एक्सप्रेस, २२६६४/२२६६५ जोधपुर-चेन्नई सेंट्रल-जोधपुर एक्सप्रेस, २२७३७/२२७३८ हिस्सार-सिकंदराबाद-हिस्सार एक्सप्रेस, ११०४५/११०४६ धनबाद कोल्हापूर-धनबाद एक्सप्रेस, २०६२५/२०६२६ चेन्नई भगत की कोठी चेन्नई एक्सप्रेस, तसेच भुसावळ व शेगांव दिशेकडून येणारे प्रवासी रात्री वर्धा रेल्वे स्थानक पर्यंत येतात त्यांना समोर म्हणजेच हिंगणघाट व बल्हारशाह कडे जातांना रात्रीच्या वेळी कुठलेही साधन उपलब्ध राहत नसल्यामुळे भुसावळ-वर्धा-भुसावळ हि मेमु ही पॅसेंजर रेल्वे सेवा बल्हारशाह पर्यंत वाढविण्याबाबत, नवी दिल्लीकडे जाण्याकरिता सेवाग्राम रेल्वे स्थानकावरुन रेल्वे गाड्याची संख्या प्रवासी वर्गाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. खाली नमुद केलेल्या सर्व रेल्वे गाड्या सेवाग्राम येथे न थांबता धावतात. नवी दिल्ली कडे जाण्यासाठी प्रवाश्यांना नागपूर वर अवलंबुन राहावे लागत असल्यामुळे सेवाग्राम येथे २०८०५/२०८०६ विशाखपट्टणम नवी दिल्ली आंध्रप्रदेश एक्सप्रेस, १२६२१/१२६२२ चेन्नई सेन्ट्रल-नवी दिल्ली तमीळनाडु एक्सप्रेस १२७२३/१२७२४ हैद्राबाद-नवी दिल्ली तेलगांणा एक्सप्रेस, १२६११/१२६१२ चेन्नई-हजरत निजामुद्दीन गरीबरथ एक्सप्रेस, १२२६९/१२२७०, चेन्नई- हजरत निजामुद्दीन दुरांतो एक्सप्रेस, १२२१३/१२२१४ यंशवंतपूर-दिल्ली रोहीला दुरांतो एक्सप्रेस, १२२८५/१२२८६ सिंकदराबाद-हजरत निजामुद्दीन दुरांतो एक्सप्रेस, १२६४९/१२६५० यशवंतपूर-हजरत निजामुद्दीन कर्नाटक संपर्क क्रांती एक्सप्रेस, १२७०७/१२७०८ तिरुपती-हजरत निजामुद्दीन आंध्रप्रदेश संपर्क क्रांती एक्सप्रेस, १२६५१/१२६५२ मदुराई-हजरत निजामुद्दीन तमीळनाडु संपर्क क्रांती एक्सप्रेस या गांडीचे थांबे मिळण्यात यावे यासाठी केन्द्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी हे आजनसरा येथिल कार्यक्रमात आले असता या विषयावर तात्काळ तोडगा काढण्याकरिता

माननीय रेल्वे मंत्री, भारत सरकार तसेच चेअरमन, रेल्वे बोर्ड यांना योग्य शिफारस करण्याबाबत निवेदन दिले होते, सदर निवेदनाची दखल घेऊन केन्द्रीय मंत्री श्री नितीनजी गडकरी यांनी केन्द्रीय रेल्वे मंत्री श्री. अश्विनी वैष्णवजी यांच्या कडे सदर थांबे मंजुर करण्याकरिता तात्काळ प्रकरणाची चौकशी करून, मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून आणि योग्य पडताळणी करून आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्याबाबत विनंती केली आहे, तसेच आज दिनांक २३ एप्रील २०२६ झेडआरयुसीसी ची बैठक आयोजीत केली आहे, या बैठकीमध्ये सदर मुद्दा उपस्थित करण्याच्या सुचना झेडआरयुसीसी सदस्य प्रणव जोशी यांना माजी खासदार रामदास तडस यांनी दिल्या आहे,

वर्धा लोकसभा क्षेत्रातील महत्त्वाच्या स्थानकांवर अनेक एक्सप्रेस व सुपरफास्ट गाड्या न थांबता पुढे जातात, त्यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात गैरसोय सहन करावी लागते. विशेषतः नियमीत प्रवास करणारे प्रवासी, विद्यार्थी, रुग्ण आणि कामगार वर्गासाठी ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे. वर्धा लोकसभा क्षेत्र मध्ये विविध रेल्वे गाड्यांचे थांबे वाढवण्याची मागणी आता अधिक तीव्र होत आहे. प्रवासी, सामाजिक संस्था आणि स्थानिक प्रतिनिधी यांच्याकडून ही मागणी सातत्याने पुढे येत आहे. कोविड-१९ महामारी नंतर जे रेल्वे थांबे वर्धा लोकसभा क्षेत्रातील वर्धा, हिंगणघाट, पुलगांव, धामणगांव, चांदूर, सेवाग्राम, सिंदी रेल्वे, तुळजापूर, वरुड, मोर्शी तसेच नव्याने निर्मीत झालेले रेल्वे स्थानक श्री. क्षेत्र रिध्दपूर येथील अनेक गाडयांचे रेल्वे थांबे स्थगीत करण्यात आले होते, तसेच पॅसेंजर गाडी सुध्दा बंद करण्यात आल्यामुळे प्रवास्यांची गैरसोय होत आहे, भुसावळ व शेगांव दिशेकडून येणारे प्रवासी रात्री वर्धा रेल्वे स्थानक पर्यंत येतात त्यांना समोर म्हणजेच हिंगणघाट व बल्हारशाह कडे जातांना रात्रीच्या वेळी कुठलेही साधन उपलब्ध राहत नसल्यामुळे भुसावळ-वर्धा-भुसावळ हि मेमु ही पॅसेंजर रेल्वे सेवा बल्हारशाह पर्यंत वाढविणे, पुलगांव व हिंगणघाट येथेएक्सप्रेस व सुपरफास्ट गाड्यांचे थांबे तसेच सेवाग्राम रेल्वे स्थानकावरुन रेल्वे गाड्याची संख्या प्रवासी वर्गाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्यामुळे सेवाग्राम येथे दिल्ली कडे जाणा-या गाडयांचे थांबे मिळणे आवश्यक आहे, आजनसरा येथे केन्द्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांना निवेदन दिले होते, निवेदनाची दखल घेऊन केन्द्रीय रेल्वे मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, तसेच आज होणा-या झेडआरयुसीसी बैठकीमध्ये सदर मुद्दा उपस्थित करण्याच्या सुचना झेडआरयुसीसी सदस्य प्रणव जोशी यांना दिल्या आहे, निश्चीतच लवकरच प्रवाशी वर्गाच्या मागण्या मान्य होतील व प्रवास्यांना दिलासा मिळेल असा विश्वास यावेळी प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार रामदास तडस यांनी व्यक्त केला.